रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३३५
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, २२ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## महाराष्ट्र निवडणुकीचे सीसीटीव्ही फुटेज देण्यास आयोगाचा नकार

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमध्ये घोळ केल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाकडे मतदान केंद्रांचे सीसीटीव्ही फुटेज मागणारे काँग्रेस नेते राहुल गांधी यांना आयोगाने नकार दिला आहे. तसे केल्यास ते मतदारांच्या गोपनीयता आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करणारे ठरेल, असे आयोगाने म्हटले आहे. ही मागणी लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० आणि १९५१मध्ये घालून दिलेल्या कायदेशीर भूमिकेच्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. असे फुटेज शेअर केले तर ज्यांनी मतदान केले आहे आणि ज्यांनी मतदान केले नाहीय त्यांच्या गोपनियतेला धोका निर्माण होईल. दोघेही असामाजिक घटकांचे लक्ष्य बनू शकतात. यामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा गटाला मतदार ओळखणे सोपे जाईल, अशी भीती निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

अंतरंग
वर्षासहलीसाठी आलेल्या तरुणाची दुचाकी चोरली/२
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
नीरज चोप्राने पॅरिस डायमंड लीग जिंकली/८

# निसर्गरम्य आणि ऐतिहासिक प्रबळगड माची येथे योगसाधना

## भाजयुमोच्या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद; आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने पनवेलजवळील प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी आयोजित योग विथ आमदार प्रशांत ठाकूर या विशेष उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, प्रांताधिकारी पवन चांडक, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यासह अनेक युवक, महिला, स्थानिक नागरिक तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतीय ऐतिहासिक परंपरेचा अमूल्य ठेवा म्हणजे योग आहे, जो भारताने पूर्ण विश्वाला प्रदान केला आहे. योगसाधनेतून मिळणाऱ्या अनन्यसाधारण लाभांमुळे शरीर व मन तंदुरुस्त राखण्याचा हा सर्वोत्तम मार्ग जगात सर्वत्र लोकप्रिय झाला आहे. त्या अनुषंगाने योग दिनाचे महत्त्व लक्षात घेत माची प्रबळगड येथे शनिवारी योग विथ आमदार प्रशांत ठाकूर हा विशेष उपक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी आरोग्य सेवा समिती पनवेलच्या वतीने योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके यांनी मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्यासमवेत सहाय्यक शिक्षक नैना म्हात्रे, प्रसाद गोडांबे, भारती गोडांबे यांचाही सहभाग होता.

प्रबळगड माची हे सह्याद्रीच्या कुशीत वसलेले, निसर्गाच्या सान्निध्यातील एक शांत आणि ऊर्जादायी ठिकाण आहे. येथे योगाभ्यास करताना नवचैतन्य मिळते. शिवाय अशा ठिकाणी योगसाधना करताना निसर्गाशी नाते जपण्याची आणि आत्मिक शांतता अनुभवण्याची संधी मिळते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने प्रबळगड माची येथे सुरू झालेला हा उपक्रम एक परंपरा बनला असून आरोग्य, युवक सशक्तीकरण आणि सांस्कृतिक जतन याला वाहिलेला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही योगप्रेमींना एकत्र आणून शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये विविध योगासने, श्वसन तंत्रे आणि ध्यानधारणा यांचे सत्र झाले.

या उपक्रमात माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, माजी सरपंच संगीता भुतांबरा, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, केदार भगत, राकेश भुजबळ, रोहित जगताप, चिन्मय समेळ, मयूर कदम, तेजस जाधव, देवांशु प्रबाळे, अक्षय सिंग, विवेक होन, शुभम कांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व निसर्गप्रेमी सहभागी झाले होते.

मागील काही वर्षांमध्ये झालेल्या योग प्रचाराचा आढावा घेतला असता योग प्रशिक्षणाची मागणी सर्वत्र वाढत आहे. योगसाधनेकडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन वाढीस चालला आहे. सर्व जगाला जोडण्याची ताकद योग शास्त्रामध्ये आहे. त्यामुळेच भारतीय परंपरेने आपल्याला प्राप्त झालेल्या या शास्त्राचा आदर करून व त्याचे आपल्या दैनंदिन आयुष्यातील महत्त्व ओळखून योग जीवनशैली आयुष्यात प्रत्यक्षपणे आणण्याचा प्रयत्न केला जात असून त्याचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम होत आहे.



# आळंदीत कत्तलखाना होऊ देणार नाही -मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी आणि तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल. वारकरी, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २१) केली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी वारी पायी पालखी सोहळा पुण्यात दाखल झाला आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांशी संवाद साधला.

दोन दिवसांपूर्वी पिंपरी-चिंचवडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात मोशी आणि आळंदी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याबाबत ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते.

पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विकास आराखड्यात मोशी-आळंदी येथे कत्तलखान्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे, मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही. त्याबाबतचे आरक्षण वगळण्याचे आदेश मी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. वारकऱ्यांना आणि वारकरी नेत्यांना सांगू इच्छितो कोणत्याही परिस्थितीत कत्तलखाना होणार नाही.

आषाढी पालखी सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांनी भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेतले. मंदिरात त्यांच्या हस्ते पालखीची पूजा झाली. मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, गुरू शांतिनाथ, राजेंद्र उमाप, भावार्थ देखणे, पुरुषोत्तम पाटील, पालखी विठ्ठल मंदिर संस्थांचे अध्यक्ष तेजेंद्र कोंढरे, विश्वस्त प्रमोद बेंगरूट, शिवाजीराव जगदाळे, गोरख भिकुले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी आषाढी वारीनिमित्त पालखीसोबत पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी विठ्ठल नामाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात टाळ मृदुंगाच्या तालावर भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखीचे विठ्ठल मंदिरात आगमन झाले. मंदिर परिसरात वारकरी व भक्तगण उपस्थित होते.

## निवडक

### अहमदाबाद विमान अपघातानंतर एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई

**नवी दिल्ली :** अहमदाबाद येथे १२ जून रोजी झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर आता नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) एअर इंडियाला त्यांच्या तीन अधिकाऱ्यांना क्रू ड्यूटी शेड्यूल आणि रोस्टरसंबंधीत जबाबदाऱ्यांवरून हटवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार चूरा सिंह (डिव्हिजनल उपाध्यक्ष), पिंकी मित्तल (मुख्य व्यवस्थापक-ऑपरेशन डायरेक्टोरेट) आणि पायल अरोडा (क्रू शेड्यूलिंग-प्लॅनिंग) यांना आवश्यक सुधारणा पूर्ण होत नाहीत असलेल्या जबाबदारीवरून दूर करण्यात आले आहे.

### शाहरूख खानचा मन्नत बंगला बीएमसीच्या रडारवर

**मुंबई :** बॉलीवूडचा किंग खान शाहरूखच्या प्रसिद्ध मन्नत बंगल्यात सुरू असलेल्या नूतनीकरणाच्या कामादरम्यान सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन)च्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप आहे. दरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) आणि वन विभागाच्या संयुक्त पथकाने शनिवारी 'मन्नत'ला भेट देत पाहणी केली. त्यानंतर अहवाल तयार करून संबंधित अधिकाऱ्यांना सादर केला जाईल.

## अभिनेता तुषार घाडीगावकरची आत्महत्या



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी एकांकिका, नाटक, मालिका आणि चित्रपटातून वैविध्यपूर्ण भूमिका साकारणारा अभिनेता तुषार घाडीगावकर याने मानसिक तणावातून शुक्रवारी आत्महत्या केली. तो ३४ वर्षांचा होता. तुषारच्या पार्थिवावर शनिवारी (दि. २१) दुपारी भांडुप स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

तुषार घाडीगावकर हा मूळचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवलीचा होता. त्याचे बालपण भांडुप परिसरात गेले. डी.जी. रुपारेल महाविद्यालयातील नाट्य विभागात सक्रिय राहून त्याने विविध एकांकिकांमधून काम केले. अभिनयासह लेखन व दिग्दर्शन करणारा तुषार एकांकिका विश्वात प्रसिद्ध होता. महाविद्यालयीन जीवनानंतर तुषारचा मालिका व चित्रपटसृष्टीतील प्रवास सुरू झाला. तुषारने अचानक टोकाचा निर्णय घेतल्यामुळे मराठी मनोरंजनसृष्टी व मित्रमंडळींना धक्का बसला आहे.

## टीम इंडियाच्या पहिल्या डावात ४७१ धावा



**लीड्स :** हेडिंग्लेच्या मैदानात सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवसाच्या खेळात भारतीय संघाचा पहिला डाव ४७१ धावांत आटोपला. कर्णधार शुबमन गिल आणि उपकर्णधार ऋषभ पंत या जोडीने ३ बाद ३५९ धावांवरून दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. यशस्वी जैस्वाल, गिलनंतर पंतच्या रूपात या कसोटी सामन्यात टीम इंडियाला तिसरा शतकवीर मिळाला, पण ढग दाटून आले अन् टीम इंडियाने सेट केलेले वातावरणच बदलले. संघाने पुढील ४१ धावांत गमावल्या सात विकेट्स गमावल्या. इंग्लंडकडून जोश टंग आणि बेन स्टोक्स यांनी सर्वाधिक प्रत्येकी चार विकेट्स घेतल्या.

# नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी भाजप कटिबद्ध

## ■ पनवेल मनपा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची ग्वाही



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घोट गावाला स्मार्ट सिटी बनवण्यासाठी तसेच परिसरातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष करीत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात नागरिकांचे सर्व प्रश्न मार्गी लावून त्यांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाजप काम करेल, अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी घोट येथे विविध विकासकामांच्या शुभारंभावेळी केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्या अंतर्गत भाजपचे युवा नेते नितेश पाटील यांच्या वतीने घोट गावातील नागरिकांना मोफत छत्री आणि परिसरातील सोसायट्यांना डस्टबिन वाटप कार्यक्रम शुक्रवारी (दि. २०) आयोजित करण्यात आला होता तसेच या वेळी घोट गावाजवळ सुमारे १२ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन, १२ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीतून साकारण्यात येणाऱ्या कोयनावेळे ते आरटीओपर्यंतच्या रस्ता डांबरीकरणाच्या कामाचे आणि सुमारे नऊ कोटी पाच लाख रुपयांच्या निधीतून बांधण्यात येणाऱ्या स्मशानभूमीचे भूमिपूजन करण्यात आले. या कामांचा शुभारंभ भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, चिटणीस आशिष कडू, नवनाथ पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, निर्दोष केणी, भाजप नेते नितेश पाटील, हालोजी निघुकर, बाळकृष्ण पाटील, मोहन पाटील, शिवराम निघुकर, हरिभाऊ पाटील, एकनाथ पाटील, मोहन निघुकर, रमेश पाटील, दिनेश केणी, रविकांत म्हात्रे, नंदकुमार म्हात्रे, सुरेश पोरजी, मंदार कदम, विनेश कदम, सुनील कदम, जयराम कदम, विजय कदम, गणेश निकोडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश भोईर समर्थकांसह भाजपमध्ये




**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजप नेते तथा महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस शुक्रवारी (दि. २०) सुएसोच्या कळंबोली येथील विद्यालायात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते सुरेश भोईर यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांनी पक्षात स्वागत केले तसेच प्रभूदास भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक रवींद्र भोईर, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, भाजप नेते एकनाथ देशेकर, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, प्रतीक्षा भोईर, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, सरस्वती काथारा, कृष्णा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, जो आपल्या वाढदिवसाला इतरांचा विचार करतो, सामाजिक उपक्रम राबवतो तो खऱ्या अर्थाने समाजासाठी उपयोगी ठरतो. अशाच पद्धतीचे सामाजिक कार्य प्रभूदास भोईर यांच्या माध्यमातून सुरू असून त्यांनी आपल्या स्वभावामुळे अनेकांची मने जिंकली आहेत, असे गौरवोद्गार काढले. (पान २ वर..)



## बेणसे येथे बुडालेल्या तिन्ही तरुणांचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील बेणसे सिद्धार्थ नगर येथे शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेले तीन तरुण बुडाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली होती. या घटनेत तिन्ही तरुणांचा मृत्यू झाला आहे. या मयत तरुणांवर शनिवारी (दि. २१) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मयत तरुणांमध्ये एकाच कुटुंबातील जोहेब जाकीर अत्तर (वय १७), मिझान जाकीर अत्तार (वय १४) हे सख्खे भाऊ, तर एकुलत्या एक अश्फाक अली अन्सारी (वय १६) याचा समावेश आहे. त्यामुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर बेणसे मोहल्ला येथे मृतांच्या नातेवाईकांसह ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

# वडगाव सरपंच गौरी गडगे, महादेव गडगे, बाळाराम शिर्के आणि समर्थकांचा आज भाजप प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते रविवारी (दि. २२) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी १०.३० वाजता नढाळ येथील पंचायतन मंदिर या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी वडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी गडगे, माजी उपसरपंच महादेव गडगे, बाळाराम शिर्के आणि असंख्य समर्थक प्रवेश करणार असून या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# सुधागडमधील जांभुळपाड्यात भाजपची मुसंडी

## ◆ काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, शेकापच्या शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

**पाली : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपने जोरदार रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. सुधागड तालुक्यात भाजपने संघटनात्मक मोठी मुसंडी मारली असून येथील अनेक ग्रामपंचायती भाजपात समाविष्ट करून घेण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. भाजपत इन्कमिंग जोरात सुरू असून शनिवारी (दि.२१) जांभूळपाडा जिल्हा परिषद गटातील अनेक गावातील शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या विकासात्मक दृष्टी, कुशल कार्यपद्धती व देशाचे व राज्याचे सक्षम नेतृत्वावर प्रभावित होऊन जाहीर प्रवेश केला.



सुधागड जांभुळपाडा विभागातील काँग्रेस, राष्ट्रवादी, शेकाप व शिवसेनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी कमळ हाती घेतल्याने भाजपची संघटनात्मक पकड मजबूत झाली आहे. भारतीय जनता पक्षाचे कमळ फुलले असून आगामी निवडणुकात भाजपचा च करिष्मा दिसेल असा विश्वास नेते व कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत. सर्व प्रवेश कर्त्यांचे खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, प्रकाश देसाई, गीता पालरेचा यांनी पक्षात जोरदार स्वागत केले.

या वेळी जांभूळपाडा जिल्हा परिषद गणातील जांभुळ पाडा व इतर प्रमुख गावातील काँग्रेस, राष्ट्रवादी व शेकाप च्या शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. प्रवेश कर्त्यांमध्ये जांभुळ पाडा येथील धडाडीचे व प्रमुख कार्यकर्ते जयवंत (आबा) बहाडकर, अतिश खंडागळे, रोहित भगत, हरीचंद्र पाटील तसेच राजू मांडवकर, सुरेश तळेकर, अविनाश शिंदे, सचिन आयरे, दिनेश भोसले, अनंता शिर्के, रमेश शिर्के, मिलिंद बहाडकर, अजित शिंदे, वैभव शिंदे, मिलिंद शिंदे, हेदवली गावचे कार्यकर्ते सुरेश काळभोर, संतोष देशमुख, प्रशांत काळभोर, सुरेश देशमुख, वऱ्हाड जांभूळ पाडा गावचे कार्यकर्ते विठ्ठल तेलंगे, जयेंद्र खंडागळे, स्वप्नील खंडागळे, रूपेश खंडागळे, आदर्श नगर गावचे कार्यकर्ते अनंता साळुंके, दिलीप महाडिक, टाटाचा माळ येथील कार्यकर्ते निलेश वाघोस्कर, चंद्रकांत देवकर, राजेश लखीमले, चंद्रकांत शिर्के, करचुंडे गावचे कार्यकर्ते संदीप ठकोरे, सौरभ ठकोरे, विशाल गुरव, संदेश लोंढे, गाठेमाळ येथील हनुमान ठोंबरे आदींसह शेकडो, तरुण महिला व ग्रामस्थांनी कमळ हातात घेत भाजपत प्रवेश केला.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील म्हणाले की, भाजपमध्ये येणाऱ्यांसाठी दरवाजे खुले आहेत, मात्र कुणासाठी आपल्याला थांबायचे नाही. भाजपचे आता येत्या काळात येणारे पीक सुपीक असेल, भाजप पक्ष नियम नियमावली व धोरणांवर चालणारा पक्ष आहे. सर्वांची विचारपूस करूनच इथं प्रवेश होतात, त्यामुळे प्रवेश कार्यक्रमास विलंब होतो, असे खासदार पाटील म्हणाले. रस्ते, पाणी, वीज, रोजगार या प्रश्नावर आता आपण काम करणार आहोत, आजच्या प्रवेशाने जांभूळपाडा ग्रामपंचायत क्रमांक१ वर असेल, असे खासदार पाटील म्हणाले.

या वेळी आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, सुधागडसह जिल्ह्यात एकूणच संपूर्ण वातावरण भाजपमय होत आहे, एकूणच कार्यकर्त्यांचा दिवसेंदिवस भाजपत येण्याचा वाढता ओघ पाहता आम्ही जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक शंभर टक्के जिंकू असा विश्वास आहे. रायगडात विकास कामासाठी निधी कुठेही कमी पडणार नाही, असे पाटील म्हणाले.

या वेळी भाजप नेत्या गीता ताई पालरेचा व वैकुंठशेठ पाटील यांनीही विचार मांडले. या पक्षप्रवेश सोहळ्यास राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई, गीता ताई पालरेचा, युवा नेते वैंकुठशेठ पाटील, अनु जाती जिल्हाध्यक्ष दीपक पवार, सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, विठ्ठल सिंदकर, आरिफ मणियार, नरेश खाडे, सूर्यकांत कराळे, ॲड आरती गुप्ता, विशाल गुरव, संदेश लोंढे, सतीश देसाई , प्रसाद गुरव, महेश गिरी आदींसह मान्यवर उपस्थित होते.

# वर्षासहलीसाठी आलेल्या तरुणाची दुचाकी चोरली

## उल्हासनगरमधून चोराला अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीमधील मोहाची वाडी येथे धबधबा वर वर्षासहली साठी गेलेल्या मुंबई येथील तरुणाची पार्किंग करून ठेवलेली बजाज पल्सर कंपनीची दुचाकीची चोरी झाली होती. या गाडीच्या चोरीची तक्रार १८ जून रोजी सायंकाळी सात वाजता नेरळ पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. नेरळ पोलिसांनी अवघ्या २४ तासात उल्हासनगर येथून त्या दुचाकीच्या चोराला दुचाकीसह ताब्यात घेतले आहे.



नेरळ गावातील मोहाची वाडी जवळ असलेल्या धबधबा येथे मुंबई गोवंडी येथील हसन रजा सेद्दिक सिद्दिक हा २८ वर्षीय तरुण आपली बजाज पल्सर कंपनीची दुचाकी घेऊन आला होता. ही दुचाकी तरुण धबधबा येथून परत आल्यावर पार्किंग केलेल्या ठिकाणी नव्हती. सायंकाळी साडे सहा वाजता येथे दुचाकी पार्किंग केलेल्या ठिकाणी दुचाकी नसल्याने लक्षात आल्यावर हसन सिद्दिकी यांनी आजूबाजूला त्या दुचाकीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्या परिसरात दुचाकी आढळून आली नसल्याने शेवटी सिद्दिकी यांनी नेरळ पोलिस ठाणे गाठले आणि तेथे आपली बजाज पल्सर कंपनीची दुचाकी हरवली असल्याची तक्रार दिली.

नेरळ पोलीस ठाणे येथे सदर दुचाकी हरवली असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार पोलिसांनी कर्जत कल्याण राज्य मार्ग रस्त्यावरील नेरळ ते उल्हासनगर रोडवरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. त्यावेळी काही तांत्रिक आणि गोपनीय माहिती नेरळ पोलिसांनी उल्हासनगर गाठले. तेथे महात्मा फुले नगर मध्ये राहणारा तरुण पंकज प्रकाश कांबळे याने (वय १९) याने दुचाकी नेल्याचे उघड झाले. या तरुणाने गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यास अटक केली.

## निवडक

### विचुंबे येथे योग दिन साजरा



**पनवेल :** प्रत्येक वर्षी २१ जून रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल यांच्या वतीने २१ जून रोजी, दादासाहेब धनराजजी विसपुते सभागृह, विचुंबे, नवीन पनवेल येथे योग दिन साजरा करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम धनराज विसपुते, अध्यक्ष आणि संगीता विसपुते सचिव–आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिनाचा सोहळा मोठ्या यशस्वीरित्या झाला.

### दामिनी पथकाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद पीएमश्री उतेखोलवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना दामिनी पथकाने शुक्रवारी भेट देऊन महिला वर्गाचे रक्षण कसे करावे या विषयावर मार्गदर्शन केले. माणगाव पोलीस ठाण्यातील दामिनी पथकातील महिला पोलीस कॉन्स्टेबल माहेश्वरी सावरकर आणि पूजा भरकडे यांनी भेट देऊन दामिनी पथक महिला वर्गाचे कसे रक्षण करते, मुलींनी स्वतः ची सुरक्षा कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. माणगाव मधील दामिनी पथकाचे महिला पोलीस कॉन्स्टेबल माहेश्वरी सावरकर आणि पूजा भरकडे यांचे शाळा व्यवस्थापन तसेच विद्यार्थी प्रतिनिधी आणि शिक्षक, आदर्श शिक्षिका विनया जाधव, शमिका आंबुर्ले, मुख्याध्यापक स्नेहल उतेकर आदींनी स्वागत केले.

# भाजप खालापूर पूर्व व खोपोली शहर मंडळतर्फे विकसित भारत संकल्प सभा

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

विकसित भारताचा अमृत काळ सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११वर्षे संकल्प सभेचे आयोजन भारतीय जनता पक्ष खालापूर पूर्व व खोपोली शहर मंडल यांचे वतीने धाकटी पंढरी साजगाव विठ्ठल रखुमाई मंदिर येथे आयोजित करण्यात आली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने ११वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानिमित्त देशाच्या विकासासाठी घेतलेल्या संकल्पना जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले. सभेमध्ये केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा विकास प्रकल्प आणि भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी आखलेल्या धोरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार यांनी मार्गदर्शन केले. अविनाश कोळी जिल्हा अध्यक्ष, सरचिटणीस दिपक बेहरे, महिला जिल्हा अध्यक्षा अश्विनी पाटील, जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, तालुका अध्यक्ष सनी यादव, खोपोली शहर अध्यक्ष राहुल जाधव, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष नागेश पाटील, संपर्क प्रमुख प्रल्हाद केणी, संपर्क प्रमुख सुनील घरत, माजी जिल्हा परिषद सभापती नरेश पाटील, उद्योजक यशवंत साबळे, युवा उद्योजक विक्रम साबळे, महिला तालुका अध्यक्षा सुजाता दळवी, गायत्री परांजपे, जगदीश आगिवले, बडगुजर, अश्विनी अत्रे, हरिभाऊ जाधव, विकास रसाळ, अविनाश तावडे, संजय देशमुख, संतोष तांडेल, प्रसाद पाटील, जयेंद्र पाटील, महेश कडू, श्वेता ताई अपर्णा साठे, मनवें, निकिता हेलांडे, यशोदा मोरे, विभावरी पाठक, अपर्णा मोरे, सीमा मोगरे, गीता मोहिते, सुप्रिया तटकरे, सुप्रिया नांदे, सुनीता महर्षी, डॉनिकेत पाटील, सरपंच विनोद खवळे, सरपंच प्रकाश पाटील, रमेश रेटरेकर, सूर्यकांत देशमुख, हेमंत नांदे, दिलीप पवार, मोहन घाडगे, मयुर पाटील, प्रसाद देशमुख, महेश कडू, स्वप्नील फराट, विशाल लोते आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सहज योगा फाउंडेशन खारघर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२१) सकाळी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला.

या कार्यक्रमाची सुरुवात सहज योगा फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान सत्रात सहभाग घेतला तसेच सुमारे १५० विद्यार्थी आणि प्राध्यापकवर्ग यांनी सत्रात सहभाग घेऊन योगाचे धडे घेतले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना योगाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी म्हटले की, आजच्या स्पर्धात्मक जीवनशैलीत योग हा तणावमुक्त राहण्याचा प्रभावी मार्ग आहे. विद्यार्थ्यांनी योगाचे नियमित अनुकरण करणे ही काळाची गरज आहे.

या वेळी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकर हेही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. महेश धायगुडे समन्वयक आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व एनएसएस अधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्गाने सहकार्य केले.



# कर्जतमधील कशेळे परिसरात योग दिन आणि वृक्षारोपण

**नेरळ : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष ग्रामीण मंडळ आणि विजयभूमी युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आज राष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधत भव्य योग शिबिराचे तसेच जागतिक पर्यावरण रक्षणाचे महत्व लक्षात घेऊन कशेळे या परिसरात वृक्ष रोपण करण्यात आले आहे. याशिवाय शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले आहे.



भारतीय जनता पक्षाचे ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ आणि त्यांचे भाजप पदाधिकारी यांनी यासाठी पुढाकार घेतला होता.

योगाचा आदर करून त्याचे फायदे जगभरात पोहोचवण्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावावरून संयुक्त राष्ट्रांनी २०१४ मध्ये २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. तेव्हापासून, हा दिवस जगभरात साजरा केला जात आहे.

ज्यामध्ये लाखो लोक योगाभ्यास करण्यासाठी आणि निरोगी, अधिक जागरूक जीवनशैली स्वीकारण्यासाठी एकत्र येतात. आज जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना कर्जत भारतीय जनता पार्टीचे ग्रामीण भाजप पदाधिकारी यांनीदेखील योगदिनाचे महत्व पटवून देण्यासाठी भव्य योग शिबिराचे आयोजन कशेळे येथील विजय भूमी या युनिव्हर्सिटीच्या प्रांगणात केले होते. सुरुवातील जामरुंग येथील शाळेच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला भाजप मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ, सचिन म्हसकर, राजेश भगत, मृणालिनी खेडकर, सुप्रिया भगत, नम्रता कांदळगावकर, निलेश पिंपरकर, विनायक पवार तसेच विजय युनिव्हर्सिटीचे संजय पडोडे, यासह भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

### शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश भोईर समर्थकांसह भाजपमध्ये

या कार्यक्रमात शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश भोईर यांच्यासह देविदास भोईर, राम भोईर, जयदास भोईर, अवदेश भोईर, रोशन भोईर, सुरज भोईर, रोशन भोईर, नारायण भोईर, अनिल घरत, प्रकाश उलवेकर, रूपेश भोईर, मिलिंद ठाकूर, अंश भोईर, सोमनाथ ठाकूर यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विकासाचे 'कमळ' हाती घेतले. या वेळी प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस साजरा झाला. त्यांना उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त भोईर यांच्या वतीने पत्रकारांना १० लाख रुपयांचा अपघाती विम्याचे वाटप करण्यात आले.

# जेएनपीए कामगार वसाहतीत योग दिन

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएने ११वा आंतरराष्ट्रीय योग दिन शनिवार, २१ जून २०२५ रोजी जेएनपीए कामगार वसाहत येथील भव्य अशा प्रांगणात योग संगम या भारतातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या भव्य योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या दिवसाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करण्यासाठी कार्यक्रमस्थळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपणही करण्यात आले होते.



जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष व व्हीपीपीएलचे अध्यक्ष आणि कार्यकारी महासंचालक उन्मेष वाघ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या वेळी जेएनपीएचे सर्व विभागप्रमुख, विश्वस्त, अधिकारी, कर्मचारी आणि प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन जेएनपीएच्या वरिष्ठ वरिष्ठ व्यवस्थापक मनिषा जाधव यांनी केले.

जेएनपीए कामगार वसाहत येथील १६ हजार ५०० चौरस मीटर क्षेत्रफळावर पसरलेल्या विशेष योग उद्यानाच्या उद्घाटनामुळे या योगसंगम कार्यक्रमाची शान वाढली.

# लाडवली गावात कृषीदूत दाखल



**महाड : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्न श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचालित कृषी महाविद्यालय मोहोप्रे –आचळोली (महाड)चे कृषीदूत लाडवली गावात दाखल झाले असून गावात ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत विविध प्रात्यक्षिक दाखवत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या वेळी त्यांनी सर्वप्रथम क्षय मुक्त ग्रामपंचायतीला भेट दिली.

मोहोप्रे येथील कृषी विद्यालयाच्या कृषी दुतांकडून ग्रामीण भागात कृषी जनजागृती केली जात आहे. याचाच भाग म्हणून हे कृषदूत लाडवली गावात दाखल झाले आहेत. यावेळी सरपंच सौ. मुबिना ढोकले, उपसरपंच दिपक बेटकर, ग्रामसेवक नितेश सातव व त्यांसोबत गावातील नागरिक उपस्थित होते.

सरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत करून सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कृषि महाविद्यालय मोहोप्रे–आचळोलीचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर आणि कार्यक्रम समन्वयक प्राध्यापिका व्ही. आर. पवार, कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक पी. टी. वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील १२ आठवडे हे कृषीदूत महाड तालुक्यातील लाडवली गावामध्ये शेतकऱ्यांना शेतीविषयक प्रात्यक्षिकांबरोबरच शेतकरी मेळावा, शेतीसंबंधी व्याख्याने, कृषी प्रदर्शन व रानभाज्या प्रदर्शन होणार आहे.

# भाजप जनतेला दिलेला शब्द पूर्ण करतो -जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष आणि या पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करणारे आहे, असे प्रतिपादन भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुक्रवारी (दि.२०) गुळसुंदे येथे आयोजित संकल्प सभेत केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील भाजप प्रणित सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सरकारच्या जनहितार्थ कामांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी गुळसुंदे येथील सृष्टी फार्म येथे संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेला रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दिपक बेहेरे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल तालुका दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल तालुका पश्चिम अध्यक्ष रूपेश धुमाळ, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल पंचायत समिती माजी उपसभापती जीवन म्हात्रे, माजी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समीती सभापती संतोष पाटील, पनवेल पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गाताडे, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष विद्याधर जोशी, ओबीसी राजेश गायकर, तालुका उपाध्यक्ष प्रविण खंडागळे, उद्योगपती बाळुशेठ पाटील, चावणे जिल्हा परिषद अध्यक्ष किरण माळी, उद्योगपती विजय मुरकुटे, केळवणे पंचायत समिती युवा अध्यक्ष सुशील ठाकूर, भाजप नेते तानाजी खंडागळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच, सदस्य उपस्थित होते.

# बंदी काळात मासेमारी करणाऱ्या चार बोटींवर कारवाई

**उरण : प्रतिनिधी**

पावसाळी बंदी काळातही अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या आणखी चार मच्छीमार बोटी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. आतापर्यंत अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या एकूण नऊ बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. खोल समुद्रातील मासेमारीसाठी बंदीचे आदेश असतानाही आदेशाचे उल्लंघन करून उरण-मुंबई-रायगड समुद्र परिसरातील काही मच्छिमार नौका ठिकठिकाणी अवैधरित्या मासेमारी करीत असल्याचे निदर्शनास आले.



त्यानंतर गस्ती दरम्यान मोरा बंदर, गव्हाण खाडी, दादर खाडी आदी समुद्र परिसरातुन चार मच्छीमार बोटी बंदीअसतानाही मासेमारी करताना आढळून आल्या. या चारही बोटी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. याआधीही बंदी काळात अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या पाच मच्छीमार बोटी ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

१ जून ते १८ जुन दरम्यान अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या एकूण नऊ मच्छिमार नौकांवर मत्स्यव्यवसाय विभागाच्या उरण येथील परवाना अधिकाऱ्यांमार्फत कारवाई करण्यात आली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. १२ आणि १४ जुन रोजी अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या ताब्यात घेण्यात आलेल्या या चार बोटीतून मिळालेल्या मासळीचा लिलाव करण्यात आला. या लिलावातून ५५ हजारांची रक्कम मिळाली. लिलावात मिळालेली रक्कम शासनाकडे जमा करण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये योग दिनाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वडाळे तलावाजवळ भव्य स्वरूपात 'योग दिवस' साजरा करण्यात आला. पंतजली योग समितीचे, भारतीय नौसेनेचे निवृत्त लेफ्टनंट पतंजली योग समितीचे मुख्य प्रशिक्षक राम पलट यादव यांनी या वेळी उपस्थितांना योगासने व प्राणायम, ध्यान याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या वेळी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, नगर रचनाकार राजेश कर्डिले, घनकचरा व स्वच्छता विभागप्रुख अनिल कोकरे, जिल्हा प्रभारी पतंजलि किसान सेवा समिति, पनवेल विभाग सर्वश्री रविंद्र मोरे, संजय कुमार सिंह , विविध सामाजिक जिल्हा प्रभारी पतंजलि पतंजलि युवा भारत, पनवेल विभाग विकास सूर्यभान देशमुख, पण्डित श्री रामकेश शर्मा, प्रमिला शशि कुमार शेट्टी, पालिकेचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाला सर्व वयोगटातील नागरिक उपस्थित होते. या वेळी पंतजली योग समितीचे राम पलट यादव यांनी ताडासन, वक्रासन, भुजंगासन, त्रिकोणासन असे आसानाचे विविध प्रकार शिकवून त्याचे फायदे सांगितले तसेच प्राणायमामध्ये कपालभाती, भ्रामरी, अनुलोम विलोम याबद्दल मार्गर्शन केले.

### खारघरमध्ये वृक्षारोपण

*योग दिनाचे औचित्य साधून स्वच्छ, सुंदर व सदृढ पनवेल बनविण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती अ खारघर येथे योग दिवस आणि वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यात आला. तसेच योग दिनानिमित्त रॅली काढण्यात आली.*

# ओवेपेठे येथील रामशेठ ठाकूर विद्यालयात योग दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात ११वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सशक्त मन, तल्लख बुध्दि, निरोगी जीवन, सशक्त व्यक्ती, सशक्त समाज, सशक्त राष्ट्र, निरोगी शरीर फायदे अनेक, उपाय एक योग! या उद्दिष्टांसाठी आज जगभरामध्ये योग विद्येचा स्विकार करुन त्याचे आचरण केले जाते. योग विद्या ही भारताने जगाला दिलेली एक अनमोल देणगी असून याचा सर्व लोकांपर्यंत प्रसार व प्रचार व्हावा म्हणून दरवर्षी विद्यालयामध्ये विद्यार्थी व शिक्षक योगासनांचे प्रकार करून योग दिन साजरा करीत असतात.

या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन विद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ७ ला करण्यात आले होते. हा योग दिन चांगल्या प्रकारे साजरा व्हावा म्हणून विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जाधव सर, जोगदंडे सर, शिक्षिका पवार मॅडम यांनी योग्य नियोजन केले होते. विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक खांदेकर सर व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या निशा नायर यांनी योग्य ते मार्गदर्शन करून सर्व विद्यार्थ्यांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. योगासनांचे प्रात्यक्षिक व प्रकार विद्यालयाचे क्रीडा शिक्षक संभाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



# उलवे येथे योग दिन



**उलवे : रामप्रहर वृत्त**

उलवे येथे भारतीय योग संस्थेंतर्गत १७ मिनोम योगा ग्रुप आणि भारतीय योगा इन्स्टिट्यूटने हनुमान मंदिरातून एकत्रितपणे ११वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. त्याचा लाभ मोठ्या संख्येने साधकांना झाला.

हनुमान मंदिराचे अध्यक्ष अवधेशकुमार महतो यांनी लोकांना योगाचे फायदे सांगितले आणि लोकांना त्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. शुभ मिश्रा जी यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

अक्षय लाल शाह, हरदया तिवारी, सुनील कुमार दास, राम कुमार शर्मा, भरत गुप्ता, मनोज मौर्य, दीपा मौर्य, मीना भावसार, डॉ. आशा, यशोदा जी, श्री शिखा, अनुराधा शुक्ला, योग शिक्षिका मीना भावसार आदी उपस्थित होते.

# एमएनएम विद्यालयात योग दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्समध्ये २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन सहज योग फाउंडेशन उलवे शाखा तसेच मोरू नारायण म्हात्रे विद्यालयातील क्रीडा शिक्षक आणि योगशिक्षक यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.



या वेळी सहज योग फाउंडेशनच्या योगशिक्षकांनी योगाचे महत्व विशद करत विविध योग प्रकार, योगाचे दैनंदिन जीवनात असलेले अनन्य साधारण महत्व विशद करत ध्यानधारणेच्या माध्यमातून आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमध्ये मनःशांती राखून उन्नती करावी याबाबत मार्गदर्शन केले.

माध्यमिक विभागाच्या शिक्षिका कांचन माने, क्रीडाशिक्षक वामन कुराडे, वर्षा नलावडे यांनी विद्यार्थ्यांना विविध योग्य प्रकारची माहिती दिली. शालेय समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



**उलवे : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर पुरस्कृत योग अभ्यास केंद्र उलवे सेक्टर १७ येथे उलवे नोड भाजप महिला अध्यक्ष योगिता भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा झाला. या वेळी योगिता भगत यांच्यासह योगा टीचर सुजाता सिंग, आशा ठाकूर, प्रेमा चौधरी, संध्या, संजीवनी बांगर, वर्षा ठाकूर आदींनी योगासने केली.**

# कामोठ्यात आंतरराष्ट्रीय योग दिन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवारी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात झाला.



योग भारतीय परंपरेचा कणा म्हणूनच आरोग्यम् धनसंपदा जपण्यासाठी योग नित्यनेमाने करायला हवा याची जाणीव करून देणारा आणि मुलांच्या मनात रुजवणूक करणारा हा दिवस म्हणजेच आंतरराष्ट्रीय योग दिवस होय संपूर्ण भारतामध्ये हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांसाठी योग साधनेचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांचे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य देखील उत्तम राहण्यासाठी योग खूपच महत्त्वाचा असतो. हे लक्षात घेऊन सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले गेले. यासाठी पतंजली योगपीठ हरिद्वार आणि भारत स्वाभिमान मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण दिले गेले. यांच्या गटांनी ओंकार,प्राणायाम तसेच बुद्धीला चालना देणारे काही योग प्रकार तसेच चपळता वाढवणारे योग प्रकार शिकवले. यामुळे विद्यार्थ्यांना योगसाधनेचे महत्त्व तर समजलेच शिवाय त्यांच्यामध्ये नवा उत्साह निर्माण झाला.

यासाठी शिवाजी कोरडे, पोपटराव कदम, रेखा सुवर्णा, रागेंद्र शर्मा, रामबाबू पात्रो, सुनील गरड, एम एन यादव तसेच एन.डी. यादव आदी मान्यवरही उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी अतिथींचे स्वागत केले. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजुरकर, नेहा खन्ना व मिनल नाईक आदी उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात योग सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) च्या जिमखाना असोसिएशन, राष्ट्रीय सेवा योजना, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, आजीवन अध्ययन तथा विस्तार विभाग आणि आर्ट ऑफ लिव्हींग यांच्या संयुक्त विद्यमाने 'योग सत्राचे' आयोजन शनिवारी (दि.२१) सकाळी ६:४५ वाजता महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात करण्यात आले.



या सत्राची सुरुवात योग प्रशिक्षकांच्या स्वागताने झाली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी आर्ट ऑफ लिव्हींगचे योग प्रशिक्षक चंद्रशेखर सापळे, संजय म्हात्रे आणि कुणाल पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सर्व उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी 'शरीर आणि मन दोन्ही नैसर्गिक पद्धतीने निरोगी ठेवण्यासाठी योगसाधना करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि एन.सी.सी. च्या ५२ कॅडेट्सनी वृक्षासन, ताडासन, अनुलोक-विलोम, प्राणायाम आदी उत्स्फुर्तपणे सादर करत 'एक पृथ्वी-एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेतून सर्वांगीण कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढवण्यात योग्य विद्येचे अनन्य साधारण महत्व आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या वेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ.बी.डी.आघाव, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस.बी. यादव, जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही.बी. नाईक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अध्यक्ष डॉ. आर. व्ही. येवले, नॅशनल कॅडेट कॉर्प्स च्या असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर प्रा. एन. पी. तीदार, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे अध्यक्ष डॉ. एस. एन. वाजेकर, विभागांचे विभागप्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, योगसत्राचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्ही. पाटील तर आभार प्रदर्शन जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही.बी. नाईक यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखाना समिती, राष्ट्रीय सेवा योजना, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग या समितीमधील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांनी केली योगासने व प्राणायमाची प्रात्यक्षिके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग' या मध्यवर्ती संदेशाच्या संकल्पनेवर (थीम) आधारित संपूर्ण जगात ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतर्राष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके अत्यंत उत्साहात झाली.



या वर्षी ११वा आंतरराष्ट्रीय योग दिन वैयक्तिक आरोग्य आणि जागतिक आरोग्य हे कायमचे एकसंघ जोडले जावेत या एका महत्त्वाच्या सत्यास अधोरेखित करण्यासाठी प्रेरित होता.आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी विद्यार्थ्यांना विविध योग प्रात्यक्षिके व प्राणायमाचे विविध प्रकार करून दाखविले. विद्यार्थ्यांनीही अतिशय उत्स्फूर्तपणे या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग नोंदवला.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, शितलकुमार म्हात्रे, विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, इयत्ता आठवी ब च्या वर्गशिक्षिका दर्शना माळी आदी उपस्थित होते.


या वेळी विद्यार्थ्यांसह सर्व शिक्षक विशेषता महिला अध्यापिकांनी स्वतः उत्स्फूर्तपणे योग प्रात्यक्षिकांचे धडे गिरवले.प्रारंभी जागतिक योग दिनाचे महत्त्व विशद करून विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांनी प्रास्ताविक केले तर विद्यालयाचे क्रीडाशिक्षक व योगशिक्षक सुरेश पारखे यांनी सर्व आसनांची त्यांच्या खास शैलीत माहिती सांगून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करून दाखविली.

या वेळी प्रात्यक्षिके सादर करण्यासाठी आरोही नाळे,वेद घरत व आर्यन गुडदे या विद्यार्थ्यांनी समूहनायक म्हणून प्रात्यक्षिकांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### ज्युनिअर कॉलेज विभागामध्येही योग दिन

विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागामध्ये देखील विद्यार्थ्यांनी योगासने व प्राणायामाचे धडे गिरवले. त्यांना ज्युनिअर कॉलेजच्या करूणा तांडेल यांनी प्रात्यक्षिके करून दाखविली. या वेळी ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय उगले, संस्थेचे विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, राजेंद्र चौधरी व इतर अध्यापक उपस्थित होते. विद्यालयात झालेला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचा सांस्कृतिक विभाग व इयत्ता आठवी ब या वर्गाचे विशेष सहकार्य लाभले.

# शूटिंगच्या शिफ्टचा वाद असू शकतो?








चित्रपटाच्या चित्रीकरणाचे (शूटिंग) वेळापत्रक असते. अमिताभ बच्चनसारख्या वक्तशीर कलाकाराने ते वर्षानुवर्ष पाळले म्हणून आज वयाच्या त्र्यऐंशीव्या वर्षीदेखील तो त्याच उत्साहात कार्यरत आहे, बिझी आहे. वेळेची किंमत त्याने केव्हाच ओळखली. याउलट गोविंदाने कधीच सेटवर येण्या-जाण्याच्या वेळा सांभाळल्या नाहीत. त्याच्याकडे बहुतेक शोभेचे घड्याळ असावे... काटे नसलेले. हे त्याचे गुण त्याच्या सुरुवातीच्या चित्रपटाच्या (शीबू मित्रा दिग्दर्शित इल्जाम, ईस्माईल श्रॉफ दिग्दर्शित लव्ह ८६) सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी गेल्यावर अनुभवले आणि मग गोविंदाच्या चित्रपटाच्या सेटवर उशिराच जायची सवय चित्रपटसृष्टीत भटकंती करणाऱ्या आम्हा सिनेपत्रकारांनी लावून घेतली. चित्रपटसृष्टीत वावरताना, फिरताना अनेक गोष्टी शिकता येतात त्या अशा.

ही गोष्ट आजच का सांगतोय? तर चित्रपटसृष्टीत सध्या शूटिंगची शिफ्ट या विषयावर उलटसुलट चर्चा सुरू आहे. चित्रपटसृष्टीतील शूटिंग शिफ्ट दिवसभरात तीन असतात. सकाळ, दुपार व रात्र. त्या लांबल्या की ज्युनियर आर्टिस्ट, ज्युनियर डान्सर, कामगार व तंत्रज्ञ यांच्या मानधनात वाढ होते. (हा चित्रपटसृष्टीतील कामगार संघटनांच्या संदर्भातील महत्त्वाचा विषय).

काही दिवसांपूर्वीच दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा आणि दीपिका पदुकोण यांच्यातील वादावरून शूटिंगची शिफ्ट ही ही चर्चा सुरू झाली. संदीप रेड्डी वांगा हा साऊथच्या चित्रपटांचा दिग्दर्शक. कबीर सिंग (२०१९), निमल (२०२३) या चित्रपटांमुळे तो जास्त फोकसमध्ये आला. (त्या चित्रपटात प्रचंड हिंसा होतीच म्हणा) त्याचा व दीपिकाचा वाद नेमका कसला? (दिग्दर्शक व कलाकार यांच्यातील वाद हे नवीन नाही. सदियो से चलता आ रहा है)

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात दीपिकाने लेकीला जन्म दिला हे तुम्हालाही माहित्येय. यानंतर ती वांगा यांच्या 'स्पिरिट' चित्रपटातून कमबॅक करणार होती. चित्रपटाची निवड चांगली होती. व्यावसायिकदृष्ट्या ते योग्यही होते. तिने वांगा यांच्यासमोर आठ तास शिफ्टची मागणी केली तसंच २० कोटींचं मानधन, प्रॉफिट शेअर याही अटी ठेवल्या. वांगा यांनी अटी अमान्य करत तिला सिनेमातून बाहेर काढलं. आपला निर्णय स्पष्ट केला. यावर चित्रपटसृष्टीतून प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होतेच.

आता दीपिकाची शिफ्टची मागणी योग्य असल्याचं म्हणत अनेकांनी तिला पाठिंबा दिला आहे. काजोलनेही यावर प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीत काजोल म्हणाली, मी एकावेळी एकाच सिनेमावर काम करते. एका वेळी चार-चार सिनेमे मी कधीच केले नाहीत. एक संपल्यानंतरच मी दुसऱ्या सिनेमाचं काम सुरू करायचे. मी कधीच २०-३० तास काम केलं नाही. एका मर्यादित वेळेतच काम करायचं हे माझं स्पष्ट होतं. यात मला माझ्या आईनेही (तनुजा) साथ दिली होती.

ती पुढे म्हणाली, माझी मुलगी नीसाचा जन्म झाल्यावर मला वर्क लाईफ बॅलन्स करणं अवघड जात होतं. अशा वेळी मला माझा नवरा अजय देवगण आणि इतर निर्मात्यांनीही मदत केली. निर्माते काहीही अडकाठी न घेता माझ्या गरजांप्रमाणे चालायचे. यू मी और हम सिनेमावेळी माझे वडील (शोमू मुखर्जी) रुग्णालयात होते. तेव्हा अजय निर्माता व दिग्दर्शकही होता आणि तो मला लवकर घरी जाण्याची परवानगी द्यायचा. त्यामुळे मला काम आणि वैयक्तिक आयुष्य यात समतोल साधता आला.

काजोलसारखाच अनुभव इतरांनाही येईल असे अजिबात नाही. मुंबईत शूटिंगच्या वेळा गाठणे ट्रॅफिकमुळे अडचणीचे असते असे वर्षानुवर्ष म्हटले जातेय. याउलट युरोपमध्ये दिवस मोठा असतो आणि अन्य गोष्टी फार नसतात म्हणून उशिरापर्यंत अधिक प्रमाणात चित्रीकरण केले जाते असेही प्रचलित आहे. आऊटडोअर्स लोकेशनवर शूटिंग करण्याचे असे काही फायदेही.

चित्रपटसृष्टीत वावरताना वेळ पाळली तर तुमच्याकडे फार काम नाही (वा नसावे) असा एक गोड गैरसमज आहे. याउलट तुम्ही शक्य तितके उशिरा आलात तर तुम्ही फार बिझी आहात असा समज होतो असाही एक समज आहे.



राजेश खन्ना जबरदस्त फॉर्मात असतानाच हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित आनंद (१९७१)मधील भूमिका त्याने स्वीकारली, पण ते करताना आपण शूटिंगसाठी रोज दोन तास नक्कीच देऊ असा वादाही केला. राजेश खन्नाच्या कारकिर्दीतील हा अतिशय महत्त्वाचा चित्रपट हे पुन्हा वेगळे सांगायलाच नको, पण एके दिवशी राजेश खन्नाला सेटवर यायला बराच उशीर झाला. यावर हृषिदा रागावले आणि त्यांनी राजेश खन्नाकडे दुर्लक्ष केले. अखेर रमेश देव यांनी अतिशय चतुरपणे मध्यस्थी केल्यावर शूटिंग सुरू झाले, हा किस्सा खुद्द रमेश देव यांनीच मला एकदा सांगितला.

मनिषा कोईराला कायमच सेटवर येण्या जाण्याबाबत बेपर्वा होती याचे अनेक किस्से आहेत. तुम्हाला आठवतेय, अनुपम खेर व ती असे दोघे सवाल दस करोड का असा एक कौन बनेगा करोडपती शैलीतील (खरंतर ती नक्कलच होती, न जमलेली) शो करीत होते. २००१ सालची गोष्ट. अर्थात, अमिताभ बच्चनशी स्पर्धा शक्यही नव्हती आणि योग्यही नव्हती. त्याची उंचीच भारी, पण जे जे सुपरहिट ते ते आपणही करावे हा चित्रपटसृष्टीचा स्वभाव, त्याला कोण काय करणार? या शोच्या शूटिंगच्या वेळेस अनुपम खेरला मनिषा कोईरालाची बराच काळ वाट पहावी लागत होती आणि त्यात वेळापत्रक गडबडायचे. मनिषा कोईरालाच्या याच वागण्याला मनोजकुमार पुरता कंटाळून गेला आणि त्याच्या दिग्दर्शनातील जयहिंद चित्रपट पूरता रखडला. मनिषाने मात्र यावर काय म्हटले माहित्येय? सेटवर कलाकार येण्याबाबत पद्धत बदललीय हे मनोजकुमार यांना माहीत नाही? बिचारा मनोजकुमार. त्याने साठच्या दशकात ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट अर्थात कृष्ण धवल चित्रपटातून काम करायला सुरुवात केली आणि अर्धा एक तास सेटवर उशिरा येणे समजू शकते अशा वातावरणात त्याने यशस्वी वाटचाल केली, स्वतःला घडवले. त्याला आज नव्हे तर उद्याच मनिषा कोईरालाने सेटवर येणे कसे मान्य होईल?

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

एकदा सुलोचनादीदींकडून मला दिलीपकुमार सेटवर येण्याबाबतची छान माहिती मिळाली. दिलीपकुमार शक्यतो सकाळची ७ अथवा ९ वाजतानाची शिफ्ट पसंत करीत नसे. दुपारी २ ते रात्री १० ही दिलीपकुमार यांची शक्यतो आवडती शिफ्ट आणि एकदा का सेटवर पाऊल टाकले की दिलीपकुमार अन्य कशाचाच विचार करणार नाही. एखाद्या दृश्याचे चित्रीकरण लांबत लांबत गेले आणि त्यात शूटिंगची शिफ्ट संपली तरी दिलीपकुमार आपले त्या दृश्याचे चित्रीकरण सुरू ठेवत. रात्रीचे अकरा साडेअकरा झाले तरी चालेल, पण ते दृश्य आजच पूर्ण करूयात. उद्या नव्याने ते सुरू करताना त्या दृश्यात तसाच रंग भरला जाईलच असे नाही. त्यापेक्षा आजच ते अधिकाधिक परिपूर्ण करूयात हा त्यांचा बाणा होता. कलाकार उगाच मोठा होत नसतो. त्यात असे अनेक लहान मोठे घटक असतात. अगदी चित्रीकरण शिफ्टचेही असतात हेच यावरून दिसते.

अक्षयकुमारचे नवीन चित्रपट वरच्या वर प्रदर्शित होत असतात यामागे शूटिंग शिफ्टचे नियोजन हेदेखील एक टॉनिक आहे. सकाळी लवकर उठून व्यायाम, ठीक ९ वाजता चित्रपट स्टुडिओत प्रवेश, संध्याकाळी शूटिंग संपल्यावर वेळीच घरी, देर रात तक चालणाऱ्या फिल्मी पार्ट्यांचे अजिबात आकर्षण नाही. अतिशय शिस्तबद्ध वाटचाल. त्याचा साजरा राजेश खन्नाचे सगळेच याच्या उलट होते. रवि टंडन दिग्दर्शित नजराना या चित्रपटाचे चेंबूरच्या एसेल स्टुडिओतील कोर्टाच्या सेटवर शूटिंग असतानाचा अनुभवच सांगतो. आम्हा सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टिंगसाठी या सेटवर आमंत्रित करण्यात आले होते. चित्रपटात राजेश खन्ना, स्मिता पाटील व श्रीदेवी असे भारी कलाकार. सेटवर जायलाच हवे हे वेगळे सांगायलाच नको. सेटवर पाऊल टाकताच दिसले ते दिग्दर्शक रवि टंडन हे स्मिता पाटील व श्रीदेवी यांच्यावर कोर्ट रूम ड्रामा चित्रीत करीत आहेत आणि राजेश खन्ना आपल्या सवय व आवडीप्रमाणे दुपारी एक-दीड वाजता येणार आहे आणि खरंच तसाच तो आला. लगेचच लंच ब्रेक झाला. सेटबाहेर एका मोठ्या टेबलावर त्याच्या घरून आलेल्या भल्या मोठ्या डब्यातील शाकाहारी व मांसाहारी जेवण लावण्यात आले. राजेश खन्नाला कशाचीच घाई नव्हती, मात्र आपले ताट हाती घेण्यापूर्वी त्याने आजूबाजूस पाहिले. आणि कॅमेरामनच्या सहाय्यकास जेवलास का? नसशील तर हे ताट घे असे म्हणाला. (हीदेखील त्याच्या व्यक्तीमत्वाची एक बाजू). जेवण झाल्यावर ३ वाजता त्याच्या दृश्याचे चित्रीकरण सुरू झाले. तात्पर्य, राजेश खन्ना आपल्या वेळेनुसार आपल्या शूटिंगची शिफ्ट करीत होता असे म्हणता येईल. काही झाले तरी तो राजेश खन्ना होता हे विसरू नका.

दैनंदिन मालिकांच्या युगात हे शिफ्टचे समीकरण काही वेगळेच झाले. एका दिवसात २० मिनिटाच्या एका एपिसोडचे चित्रीकरण पूर्ण व्हायलाच हवे (अन्यथा एकादा कलाकार जाऊदेत, अगदी एखाद्या दिग्दर्शकाचीही गच्छंती होऊ शकते).

चित्रीकरणाची शिफ्ट हा खूपच मोठा विषय आहे हे एव्हाना तुमच्या लक्षात आले असेलच. आजच्या काळातील निर्मिती संस्था याबाबत प्रचंड व्यावसायिक आहेत. लेखी करारातच चित्रीकरणाचे स्पॉट, दिवस, वेळ, मानधन, प्रमोशनसाठीचा वेळ हे सगळेच देतात. काही कलाकार त्याच्यातूनही आपल्या फायद्याचे मार्ग काढतातही. या सगळ्यातून चित्रपट, मालिका, इव्हेन्टस, जाहिरातपट, लघुपट, माहितीपट यांचे अफाट पीक येणे सुरू आहे. तेच तर महत्त्वाचे आहे असेच म्हणायचे काय?

---

# आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब महाराष्ट्रात



देशाच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत भारतात शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५०%पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत तसेच महाराष्ट्रातही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

महाराष्ट्रात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, पारदर्शक भरती प्रक्रिया, विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना देणे यावर अधिक भर देऊन उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल घडवत राज्यातील शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, लोकाभिमुख केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने मुंबई, नवी मुंबई येथे पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे स्वतंत्र कॅम्पसेस उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला असून भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात हा मैलाचा दगड ठरणार आहे.

**पहिल्या टप्प्यात सहभागी आंतरराष्ट्रीय विद्यापीठे**

युनिव्हर्सिटी ऑफ अ‍ॅबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया), इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका), इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) या पाच नामवंत विद्यापीठांनी मुंबईत आपले शैक्षणिक केंद्र स्थापन करण्यास सहमती दर्शवली आहे. त्यांना केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून परदेशी विद्यापीठांना दिले जाणारे LOI (Letter of Intent) प्रदान करण्यात आले आहे. या विद्यापीठांपैकी अनेक संस्था त्यांच्या देशात टॉप १०० मध्ये आहेत आणि Go8, Russell Group किंवा आयव्ही लीग यांसारख्या उच्च दर्जाच्या संघटनांशी संलग्न आहेत. भारतातील त्यांच्या कॅम्पसेसना पदवीपूर्व, पदव्युत्तर, पीएच.डी., डिप्लोमा आणि संशोधन कार्यक्रम राबवण्यासाठी पूर्ण स्वायत्तता आणि मान्यता देण्यात आली आहे.

भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण, देशातच विद्यार्थ्यांना आता जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम, संशोधन संधी आणि अनुभव परदेशी न जाता देशातच उपलब्ध होतील. हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल. हे अभ्यासक्रम स्थानिक औद्योगिक गरजांनुसार अनुकूल केले जातील. संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योग सहकार्याला चालना मिळेल. विद्यार्थ्यांना एक्स्चेंज प्रोग्राम्स, सेमिस्टर ट्रान्सफर, ग्लोबल इंटर्नशिप्स यांसारख्या संधी उपलब्ध होतील आणि प्राध्यापक व संशोधक यांचाही आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग वाढेल.

**प्रत्येक विद्यापीठाचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान**

युनिव्हर्सिटी ऑफ अ‍ॅबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.)

भारतामध्ये कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ. जागतिक समस्यांवर उपाय शोधणाऱ्या अभ्यासक्रमांवर विशेष भर.

युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.)

STEM², व्यवसाय आणि संशोधन क्षेत्रातील अभ्यासक्रम. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक कार्यबलासाठी सक्षम करणे हे मुख्य उद्दिष्ट.

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया)

एआय, सायबर सुरक्षा, बिझनेस आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीजसाठी विशेष अभ्यासक्रम. जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम डिझाइन.

इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका),

इंजिनिअरिंग, संगणक विज्ञान आणि बिझनेस क्षेत्रात अग्रगण्य. एश्रर्शीरींश प्रोग्रामच्या माध्यमातून संशोधन, इंटर्नशिप आणि रिअल-वर्ल्ड अनुभव.

इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली)

फॅशन, प्रॉडक्ट डिझाईन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशन क्षेत्रात कौशल्याधारित, क्रिएटिव्ह शिक्षण देणारे प्रतिष्ठित संस्था आहेत.

राज्य शासन केवळ परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारत नाही, तर महाराष्ट्रातील विद्यापीठांनाही आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधी प्रदान करत आहे. यामध्ये Twinning, Dual Degree आणि Joint Degree कार्यक्रम संशोधन सहकार्य व विद्यार्थी-प्राध्यापक आदान-प्रदान असून उद्यमशीलता व नवोन्मेषावर आधारित आहे

यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता वाढविणे या सहकार्यामुळे राज्यातील विद्यापीठांचे ग्लोबल रँकिंग सुधारण्यास मदत होईल, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील करिअर व संधी उपलब्ध होतील आणि उद्योग-संस्थांशी थेट जोडले जातील

मुंबई रायजिंग - क्रिएटिंग न इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी या महाराष्ट्र सरकारच्या उपक्रम अंतर्गत, पाच जागतिक स्तरावर प्रसिद्ध परदेशी विद्यापीठांना मुंबई आणि नवी मुंबईत त्यांच्या कॅम्पसची स्थापना करण्यासाठी इरादापत्रे अधिकृतपणे प्रदान केली गेली आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली, सिडकोमार्फत उभारल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय एज्युसिटीमुळे संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी मिळणार असून हे शिक्षण विविध संस्कृतींच्या आदान-प्रदानाला चालना देईल आणि विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सहकार्य व संवाद वाढवेल.

भारतामध्येच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे आणि परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस महाराष्ट्रात स्थापन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पाच किलोमीटर परिसरात सर्वोच्च १० परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. ही देशातील पहिली अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे.

हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य २०२९पर्यंत साध्य करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक ठरेल.

हा उपक्रम म्हणजे 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वज्ञानाचा शैक्षणिक अविष्कार आहे. महाराष्ट्राची ही वाटचाल केवळ राज्यापुरती मर्यादित नसून ती नव्या भारताच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारी आहे.

-काशीबाई थोरात-धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी

---

# जैवविविधतेने समृद्ध असलेले माथेरान







माथेरान हे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. पर्यटक येथील निसर्गसौंदर्याचा आनंद लुटून जातात. पर्यटनाव्यतिरिक्त माथेरानच्या निसर्गामध्ये लपलेले पैलू अजूनही पर्यटकांसह येथील माथेरानकरांनाही माहिती नाही. त्यापैकी एक म्हणजे येथे असणारी जैवविविधता. माथेरान हे जैवविविधतेने समृद्ध असे पर्यटनस्थळ आहे.

माथेरानचे पर्यटनस्थळावरील जंगल ७०० हेक्टरमध्ये पसरलेले असून ३०० हेक्टर परिसर माथ्यावर असलेले रान आणि ४०० हेक्टर माथेरानच्या खालचा परिसर असून येथे अनेक प्रकारच्या किडे, मुंग्यापासून विविध पक्षी तसेच प्राणी आणि अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती आहेत. ऋतूनुसार येथे जैवविविधतेचे प्रकार पहावयास मिळतात.

पावसाळ्यात गोगलगाय, सुरवंट, जळू, गांडूळ, वेगवेगळ्या प्रजातीचे साप; त्याचबरोबर पावसाळ्यातील वातावरणामुळे वर्षातून एकदा येथे वास्तव्यास येणारे पक्षी पहावयास मिळतात. हिवाळी मोसमात प्रामुख्याने फुलपाखरे दिसतात. या ठिकाणी फुलपाखरांच्या विविध प्रजाती आढळतात, तर इतरत्र उडणारे चतुरसुद्धा दिसतात. येथील जंगलात फिरावयास गेल्यास कीटकांच्या वेगवेगळ्या प्रजाती दिसतात, त्यामध्ये काही दुर्मीळ प्रजातींचा समावेश आहे. वातावरणानुसार बागडणाऱ्या दुर्मिळ पक्ष्यांचे दर्शनही घडते.

माथेरानचे घनदाट जंगल असल्यामुळे औषधी वनस्पतीसुद्धा भरपूर प्रमाणात आहेत. आजही जुनी, जाणकार मंडळी औषधी वनस्पतींचा वापर करताना दिसतात. माथेरानमधील निसर्गमित्र संस्थेच्या अभ्यासानुसार २० वर्षांपूर्वी जे सजीव दिसत होते तेच सजीव आताही दिसत आहेत. म्हणजे माथेरानचा निसर्ग आपले अस्तित्व टिकवून आहे. येथे कोणतीही प्रजाती लोप पावली नसल्याचे संस्थेचे अध्यक्ष पवन गडवीर यांचे म्हणणे आहे.

**जैवविविधतेचे स्वरूप**

जैवविविधतेचे स्वरूप हे अधिवासांवर अवलंबून असते. जंगलात आढळणारी जीवांची विविधता ही गवताळ रानात दिसून येणाऱ्या जैवविविधतेपेक्षा भिन्न असते. अधिवसानुसारच तेथील जीवांची जडणघडण होत असते. या जीवांमुळेच अधिवासांचे संतुलन राखले जाते.

**जैवविविधतेचे महत्त्व**

जैवविविधता टिकाऊ महत्त्वपूर्ण क्रियाकलापांच्या मूलभूत गरजा स्त्रोत प्रदान करते. इकोसिस्टम जटिल, विविध संरचना आणि कार्ये मिळवण्याचे कारण वन्य प्रजाती टिकून राहतात, विकसित होतात, विविधता आणतात आणि नवीन अनुवांशिक वैशिष्ट्ये आत्मसात करतात. वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती निसर्गामध्ये आढळतात.

**जैवविविधता म्हणजे काय?**

जैवविविधता मानवी जीवनाचा आधार आहे. पृथ्वीतलावर सजीवांची जी काही विविधता आढळते त्यालाच जैवविविधता असे संबोधले जाते. ही विविधता तीन पातळ्यांवर असते - प्रजाती, परिसंस्था आणि जनुकीय. जैवविविधतेमध्ये प्रामुख्याने दोन प्रकार पडतात वन्य आणि पाळीव किंवा घरगुती. वन्य जैवविविधता म्हणजे जी झाडे-झुडपे, पशु-पक्षी-कीटक इत्यादी जंगलात किंवा आपल्या आसपास मानवी मदतीशिवाय वर्षानुवर्षे अस्तित्वात आहेत अशी. यामध्ये जंगलातील वाघ-भेकरपण येतात आणि आपल्या अंगणा-परसातील पक्षी-साप-कीडे हे ही येतात. पाळीव किंवा घरगुती जैवविविधता म्हणजे असे जीव जे मानवाने स्वतःच्या उपयोगासाठी जोपासलेले आहेत व ज्यांची देखभाल मानावाद्वारे केली जाते.

जैवविविधता राखणे काळाची गरज

जैवविविधता राखणे हे अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणात बदल झाले तरी जनुकीय विविधता टिकून राहते. एका कोणत्याही क्षणी किंवा स्थानी, विशिष्ट सजीवांतील जनुके त्या सजीवाला बदललेल्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यास मदत करतात. सजीवांच्या ज्या जातीत जनुकीय लक्षणांमधील विविधता अधिक असते, असे सजीव पर्यावरणीय बदलांशी जुळवून घेण्यात अधिक सक्षम असतात.

माथेरानचे जंगल फार मोठे आहे. असे असले तरी वन विभागाच्या माध्यमातून सर्व कर्मचारी जंगल भ्रमण करत असतात. येथे शिकार करण्याचे प्रमाण नगण्य झाले असून वनसंपत्ती,पक्षी,प्राणी याची संख्या वाढलेली दिसत आहे. घुबड, स्वर्गीय नर्तकहे पक्षी, तर रानडुक्कर, भेकर तसेच राज्य प्राणी शेकरू याचे प्रमाण वाढले असून हे सर्व दृष्टीस पडतात, असे वन विभागाचे अधिकारी उमेश जंगम यांनी सांगितले.

(संकलन : संतोष खाडे)

## निवडक

### प्राथमिक शाळांमध्ये योग दिवस



**चौक :** योग दिनाचे औचित्य साधून खालापूर तालुक्यातील शाळांमधून योग दिवस अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थी यांना योगाची विशेष आवड निर्माण करण्यासाठी शिक्षक यांनी महत्व विषद करताना मेहनत घेतली. योगासनामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी अनेक फायदे मिळतात. नियमित योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, स्नायू मजबूत होतात, ताण कमी होतो तसेच एकाग्रता आणि मानसिक शांती वाढते.

### पेणमध्ये शालेय साहित्य वाटप



**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या माजी मुख्याध्यापिका तथा शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ कलावती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आज पेण पालिकेच्या शाळा क्रमांक दोन मधील मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता म्हात्रे, शिक्षिका योगिता कर्णे कर, सामाजिक कार्यकर्ते संजय पाटील, विजय चव्हाण, संजय खांडेकर, पार्थ शहा, राकेश सांडे, युवा नेते हितेश पाटील, प्रसाद पाटील, हेमंत गुरव, साईश खांडेकर तसेच परिसरातील महीला मंडळ उपस्थित होते.

### नवोदय विद्यालयात योग दिवस

**माणगाव :** जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर रायगड येथे



विद्यालयाचे प्राचार्य पी. डी. राघमवार सर यांच्या कुशल मार्गदर्शनात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. मानवाच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाचे अनन्यसाधारण महत्व आहे,म्हणून विद्यालयात सर्व उपस्थित शिक्षक आणि शिक्षकेतर स्टाफ सदस्यांनी सकाळी ६.३० वाजता उपस्थित राहून विविध योगासने करून, जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे योग दिवस साजरा करण्यात आला.

### वडघर मुद्रे येथे योग दिन



**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित सरस्वती विद्यामंदिर वडघर विद्यालयात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक गजानन पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. क्रीडा शिक्षिका विद्या शिर्के यांनी विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करून घेतली. शिक्षक विठ्ठल पवार यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दररोज सूर्यनमस्कार, योगासने करण्याचा संकल्प केला आहे.

### ढालघर येथे विद्यार्थी प्रवेशोत्सव



**माणगाव :** तालुक्यातील रा. जि. प. शाळा ढालघर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाची सुरुवात दि. १६ जून २०२५ रोजी उत्साहात झाला. सर्व मुलांना शासनामार्फत दिल्या जाणारे मोफत पाठ्य पुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच मोफत गणवेश व बूट यांचेदेखील वाटप करण्यात आले. महसूल नायब तहसिलदार डॉ. अरविंद घेमूड यांनी सदिच्छ भेट दिली. या वेळी संतोष मालोरे, केंद्र प्रमूख ढालघर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रृती तेटगुरे, अदिती तेटगुरे, पोलीस पाटील चैताली तेटगुरे, अंगणवाडी ताई सुवर्णा वडेकर, मदतनीस मनिषा तेटगुरे, सदस्य सोनल तेटगुरे, तसेच पालकवर्ग हे उपस्थित होते.

### रेवोली येथे शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ

**रोहे :** रा.जि.प रेवोली शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज उमाजी गिजे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी खारापटी केंद्रप्रमुख कल्पना पवार, साधन व्यक्ती कलावती वालेकर, गावातील शिक्षणप्रेमी, बालके व शिक्षक उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापिका मनिषा उदय मोरे यांनी केले. इयत्ता पहिलेमध्ये दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पावलांचे ठसे उमटवून त्यांचे आनंदाने औक्षण करून त्यांचे प्रवेश करण्यात आले. यानंतर मुलांना फुले व खाऊ देवून त्यांचे व त्यांच्या पालकांचे स्वागत करण्यात आले. उपशिक्षिका शिल्पा किशोर चंदनबटवे यांनी सर्वांचे आभार मानले.



# चौक-कर्जत रस्त्यावर सतत वाहतूक कोंडी

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई, पनवेल, चौक दिशेकडून कर्जत कडे जाणाऱ्या चौक कर्जत फाटा येथे बेशिस्त वाहन चालक यांच्या मुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. त्याचा त्रास स्थानिक वाहन चालकांच्याबरोबर वाहतूक पोलीस यांना होताना दिसत आहे.

आज शनिवार उद्या रविवार दोन्ही दिवस शहरी भागातील लोकांसाठी पिकनिक डे. चौक कर्जत मार्गावर आणि कर्जत तालुक्यात असलेल्या रिसॉर्ट, हॉलिडे होम, बंगलो, हॉटेल,फार्महाऊस आणि स्वतः च्या मालकीचे असलेल्या ठिकाणी जाण्यास मुंबई, नवी मुंबई,ठाणे येथून येणाऱ्या लोकांची प्रचंड गर्दी होत असते. त्यांच्या मालकीच्या गाड्या चौक कर्जत मार्गावर जाण्यासाठी स्पर्धा लागल्यासारख्या मागेपुढे धावत असतात. त्यामुळे या मार्गावर प्रवेश करताना प्रचंड गर्दी होऊन वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

या वळणावर बस स्टॉप, रिक्षा स्टँड, लागूनच हॉटेल आहे. बेशिस्त वाहन चालक गाडी पुढे नेण्याच्या नादात लाईन ची शिस्त बिघडून लावतात. त्यामुळे एक गाडी पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असताना दुसरी मागून पुढे जाण्याचा प्रयत्न करत असते, याठिकाणी दुभाजक नसल्याने वाहन चालक यांना मोकळा रस्ता मिळतो आणि ते शिस्त बिघडून लावतात, शनिवार व रविवार येथे वाहतूक पोलीस तैनात करण्यात येतात, या गाड्यांमधून अर्धे अधिक तखझ असता, किंवा तखझ स्टिकर लावलेली वाहने असतात, त्यामुळे पोलीस देखील जास्त ताण घेत नाहीत.या वाहतूक कोंडी चा त्रास स्थानिक नागरिकांना, स्थानिक वाहन चालक यांना जास्त होतो.

**बेशिस्त चालकांमुळे वाहतूक पोलीसही हैराण**



## नवनिर्मित महाजने पुल वाहतुकीस खुला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील बेलोशी ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेले महाजने पुल वाहतुकीस खुले झाल्याने एस.टी. बस सुरू करण्यात आली असून यामुळे विद्यार्थी, ग्रामस्थ व नोकरदार वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येत असलेल्या बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील महाजने पुलाचे नव्याने बांधकाम मे. सुरज कंस्ट्रक्शन चेंढरे-अलिबाग यांनी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण बाहय रस्ते विकास योजने अंतर्गत करण्यात आले, या महाजने नविन पुलाचे निर्मितीसाठी अंदाजे ७३ लाख रूपये निधी उपलब्ध करण्यात आला होता.

या महाजने नुतन पुलाचे काम आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्नातून तसेच जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे यांच्या मागणीने करण्यात आले होते.

नव्याने बांधलेले पुलाचे काम पुर्ण झाल्याचे पत्र रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे वतीने राज्य मार्ग परिवहन महामंडळ अलिबाग आगार यांना शुक्रवार २० जुन २०२५ रोजी देण्यात आले असून काम सुस्थितीत आहे, एस.टी. बससेवा सुरू करण्यास कोणतीही हरकत नाही असे पत्र दिले. त्यानुसार राज्य मार्ग परिवहन महामंडळाची महाजने एस.टी. बस सेवा अलिबाग आगारातून सुरू करण्यात आली आहे.

महाजने नदीवरील जुने पुलाची दयनीय अवस्था झाली होती, व नवीन पुलाची अंत्यत बांधणे अत्यंत गरजेचे व आवश्यक होते, नवीन पुलाचे कामाचे बांधकामाची पुर्तता झाली असून महाजने ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी तसेच जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे यांचे आभार मानले आहे.

## वासांबे ग्रामपंचायतीकडून आंतरराष्ट्रीय योग दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्राम पंचायत वासांबे मोहोपाडा यांच्यावतीने अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी मोहोपाडा येथील अमृत सरोवर तलाव काठाजवळ विविध प्रकारच्या योगा करण्यात आले.

या वेळी सरपंच उमा संदिप मुंढे म्हणाल्या की, आज प्रत्येकाला ताण तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये नियमितपणे योगा, व्यायामाचा समावेश करावा. योग हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारिरीक, मानसिक, आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला उर्जा प्राप्त होते असते.

योगामुळे मन:शांती तर मिळतेच शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रता सुध्दा वाढण्यास मदत होते असे सरपंच उमाताई संदिप मुंढे यांनी बोलताना सांगितले.या योगात ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी सहभागी झाले होते.




## अंजुमन इस्लाम कॉलेजमध्ये ऑनलाईन कार्यशाळा

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा, रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ जून ते २३ जून २०२५ या कालावधित आयपीआर आणि केमोइन्फॉरमॅटिक्स यावर चार दिवसिय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



या ई-कार्यशाळेचे उद्दिष्ट शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना आयपीआर आणि केमोइन्फॉरमॅटिक्स विषयी सविस्तर ज्ञान मिलावे. संशोधन कार्य करताना ते या विषयातिल विविध पैलूंचा वापर करू शकतात.या कार्यशाळेचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख, प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशालेची प्रस्तावना प्रा. तमसील शहाजहान व डॉ. गुरुमीत वाधवा यानी केली तसेच उद्घाटन समयी डॉ. आमोद ठक्कर, डॉ.अनिल पालवे व डॉ. साजिद शेख यानी आपले मनोगत व्यक्त करूण कार्यशालेसाठी शुभेच्छा दिली.

या कार्यशाळेमध्ये ५० हून अधिक विद्यार्थि वा प्रध्यापकानी सहभाग घेतला. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## माथेरानमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन

**माथेरान : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी येथील कम्युनिटी सेंटर येथे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी स्थानिक नागरिक, शालेय विद्यार्थी आणि महिलांनी सहभाग घेतला.



आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी कम्युनिटी सेंटर येथे योगदिन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावं व शारीरिक दृष्ट्या सदृढ राहावं म्हणून माथेरान शहरातील भाविन ठक्कर यांच्या संकल्पनेतून आयोजित झालेल्या योगदिनासाठी माथेरानमधील नागरिकांनी विशेष करून महिला वर्ग, नगरापरिषदेचा कर्मचारी वृंद, प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यालयाचे सर्व शिक्षक व सर्व विद्यार्थ्यांनी या शिबिराला उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपाली मिसाळ नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे आदी उपस्थित होते.

## खोपोलीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**खोपोली : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त बूज हास्य परिवार खोपोली यांच्या बरोबर भाजप खोपोली शहर मंडलाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शनिवारी लोहाणा समाज हॉल येथे आयोजित केलेल्या योग सत्रात उपस्थित राहून व सहभाग घेऊन योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

भाजपच्या वतीने या कार्यक्रमासाठी अश्विनीताई पाटील जिल्हाध्यक्षा भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हा, राहुल जाधव अध्यक्ष भाजप खोपोली शहर मंडल, विकास नाईक, अपर्णा साठे, हेमंत नांदे, सुमिता महर्षी, भारती शाह, सीमा मोगरे, विमल गुप्ते, विभावरी पाठक, अजय इंगुळकर, स्नेहल सावंत, सुनील नांदे, सुप्रिया नांदे, भाजपचे बहुसंख्या पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हास्य क्लब तर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला भाजप महिल जिल्हाध्यक्ष अश्विनीताई पाटील यांचाही यावेळी हास्य क्लब तर्फे सत्कार करण्यात आल. यावेळी हास्य क्लब खोपोलीचे संस्थापक अध्यक्ष बाबुभाई ओसवाल व इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## वरसे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वरसे कार्यालय येथे ग्रुप ग्रामपंचायत वरसेच्यावतीने शनीवारी अंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला आहे.



या वेळी सरपंच रामाशेठ देवजी म्हात्रे, माजी उपसरपंच शांतीशील पांडुरंग तांबे, माजी उपसरपंच मनोहर (मामा) सुर्वे, सदस्य उत्तेश कांबळे, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रेय सावंत, योग प्रशिक्षक तुकाराम काते, योग प्रशिक्षक विभा चोरगे, ग्रामपंचायत कर्मचारी वृंद, तलाठी, ग्रामपंचायत कार्यालयीन कर्मचारी वृंद, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आदी उपस्थित होते. या वेळी योग प्रशिक्षक विभा चोरगे यांनी उपस्थितांना योग याबद्दल माहिती देत विविध योगासने घेतली.

## निरोगी आयुष्य हीच जीवनाची खरी गुरूकिल्ली -प्रतिभा पोतदार

**मुरूड : प्रतिनिधी**

योगा केल्यामुळे शरीर तंदुरुस्त व निरोगी राहते हीच निरोगी जीवनाची खरी गुरूकिल्ली आहे, असे प्रतिपादन मुरुड जैन समाज हॉल तळमजला मध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त बजरंग व्यायामशाळा आयोजित कार्यक्रमात मानसशास्त्रज्ञ - प्रतिभा पोतदार यांनी केले.

या वेळी ताड़ासन भुजंगासन. कपालभाती. अनुलोम विलोम.सेतुबंधासन सर्वांगासन शवासन महिलांना योगासनाचे विविधप्रकार दाखविलचे व आपल्या दैनंदिन जीवनात शरीराला होणारे फायदे सविस्तर सांगितले.

या वेळी बजरंग व्यायाम शाळेचे संस्थापक आशिष खोत, डॉ. हितेश जैन, डॉ. ईप्सित पाटील, डॉ.मयुर कल्याणी, डॉ. राज कल्याणी, लक्ष्मी कल्याणी, परेश शहा, मंगेश दांडेकर, सुनील पटेल, अशोक जैन, हेमा पटेल, माजी शिक्षिका कासार आदी उपस्थित होते.



यावेळी बजरंग व्यायाम शाळेचे संस्थापक आशिष खोत मार्गदर्शन करताना म्हणाले की माणसाचे शरीर तंदुरुस्त व निरोगी राहायचे असेल तर दररोज योगा व व्यायाम करणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन या वेळी आशिष खोत यांनी केले.

तरुण तरुणांनी मोबाईल मध्ये वेळ न घालवता आपलं आरोग्य चांगलं राहण्यासाठी रोजच्या रोज प्रत्येकांनी सकाळी योगा करावा असे आवाहन प्रसिद्ध डॉ.राज कल्याणी यांनी केले.

## तळा तालुक्यात योग दिन उत्साहात

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, पंचायत समिती, महाविद्यालये आदि ठिकाणी आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात झाला.

सकाळी शासकीय कार्यालये व शाळांमधे विद्यार्थ्यांचा, पालकांचा व कर्मचारी यांचा सदर कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभाग होता. यामधे पुरक हालचाली, प्राणायाम, वज्रासन, ताडासन, पद्मासन, वृक्षांसन, योग मुद्रा इत्यादी प्रात्यक्षिके करण्यात आली त्याच बरोबर योजनांचे कोणते फायदे होतात याची माहितीही देण्यात आली. चांगल्या आरोग्यासाठी नियमित योगासने करणे आवश्यक आहे.

याच दिवशी शाळांमधे एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षलागवड करण्यात आली या झाडांना विद्यार्थ्यांच्या आईचे नाव देण्यात आले आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमूद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नावे राजे मल्हारराव होळकर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कळंबोली, ता. पनवेल जि.रायगड सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २३/०६/२०२५ ते २७/०६/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ३०/०६/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि. ०२/०७/२०२५ ते १६/०७/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २०/०७/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहीती लेखापरीक्षक, सहकारी संस्था पनवेल इंदिरा हरिहर बिल्डींग, तळ मजला, लाईन आळी, न्यु म्हात्रे हॉस्पीटल जवळ, ता. पनवेल, जि. रायगड. या कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(मोहन ढेरंगे)
निवडणूक निर्णय अधिकारी

# निवडक

## आश्रमातून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** सील आश्रम वांगणी (नेरे) येथून १९ वर्षीय ममता बिसवनाथ गौड ही तरुणी कोणाला काही न सांगता निघून गेली. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. ती अंगाने मध्यम, उंची पाच फूट आहे. तिने निळा शर्ट आणि काळी जीन्स परिधान केली आहे. तिला हिंदी भाषा बोलता येते. या तरुणीबाबत माहिती असल्यास पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गाडीची काच फोडून चोरी

**पनवेल :** तीन वाहनांच्या काचा फोडून चोरांनी एक लाख ६५ हजार रुपये किमतीचे लॅपटॉप, मॅजिक कीबोर्ड, चार्जर असा एकूण एक लाख ६५ हजार रुपये किमतीच्या ऐवजाची चोरी केली. चोराविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. केदार कौलास हे खारघर येथे राहत असून १७ जून रोजी त्यांच्या कारची कॉच फोडून लॅपटॉप चोरून नेला तर अश्विन कुमार कापडणीस यांच्या कारची काच फोडून चोरांनी एप्पल पेन्सिल, मॅजिक कीबोर्ड, आयपॅड चोरून नेले. आणि रविकांत पांडे यांच्या कारची काच फोडून लॅपटॉप, आयफोन, चार्जर चोरून नेले.

## लहान मुलांसह आई बेपत्ता

**पनवेल :** दोन लहान मुलांसह आई घरात कोणाला न सांगता



निघून गेल्याने ते हरवले असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली. पूनम हनुमंत गुट्टे (वय २१), मुलगा सोमेश्वर (वय सहा) आणि मुलगी सायली (वय वर्ष तीन) यांना सोबत घेऊन त्या घरातून निघून गेल्या. त्यांची उंची पाच फूट, रंग सावळा, डोळे काळे आहेत. अंगात काळ्या रंगाचा कुडता, पायजमा परिधान केला आहे.

## मंगळसूत्र, चेन पळवली

**पनवेल :** महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि सोन्याची चेन खेचून नेल्या प्रकरणी चोरांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पार्थिबन चंद्रशेखर हे सेक्टर ३५ आय, खारघर येथे राहत असून ते त्यांची पत्नी मुलगा आणि आई असे घरातून नाश्ता करून स्टेटस विहार सोसायटी समोर आले. ते पुढे चालत जात असताना त्यांच्या आईच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि सोन्याची चेन खेचून चोरटे मोटरसायकल वरून पसार झाले. आठ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्या प्रकरणी चोरा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## नवीन पनवेलमध्ये घरफोडी

**पनवेल :** घरात जबरदस्तीने प्रवेश करून बेडरूम मध्ये असलेल्या कपाटाचा लॉक तोडून तीन लाख ६० हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी चोरांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १५ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. विनोद गुरमे हे नवीन पनवेल, अष्टविनायक बंगलो येथे राहत असून त्यांनी तीन लाख साठ हजार रुपये कपाटात ठेवले होते. १५ जून रोजी ते मित्राच्या कडे कामानिमित्त गेले होते. या वेळी चोरांनी घराच्या खिडकीचे आतील जाळी बेंड केली आणि घरात प्रवेश केला आणि तीन लाख साठ हजार रुपये चोरून नेले.

## रसायनीतून तरुण बेपत्ता

**मोहोपाडा :** रसायनीतील बोरीवली येथे राहणारा रामप्रवेश



बिरबल भुईंया (वय २२)हा वाशिवली येथे डॉक्टरकडे जातो असे सांगून निघून गेला.तो अद्याप न परतल्याने त्याचे वडील बिरबल जोगेश्वर भुईंया रा.बिहार सध्या लेबर इंडिया कॉलनी, बोरीवली (रसायनी) यांनी रसायनी पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार दिली आहे. बेपत्ता राम प्रवेश बिरबल भुईंया हा रंगाने सावळा, उंची पाच फुट दोन इंच, अंगात पिवळा शर्ट व राखाडी रंगाची साधी पॅन्ट, डाव्या हातावर ब्लेडचे कट मारलेले निशाण, पायात चप्पल, चेहरा गोल, हनुवटी जवळ काळातिळ असे वर्णन असून सदर वर्णनाचा युवक कुठेही आढळल्यास रसायनी पोलीस ठाणे– ८४३०४९६९५, पोलीस नाईक मंगेश लांगी (९१९८३५१०९५) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# फसवणुकीचे प्रकार वाढले

## लॉटरीच्या बहाण्याने ज्येष्ठ नागरिकाला गंडा

**पनवेल : वार्ताहर**

लॉटरीच्या बहाण्याने ४५ लाख ७० हजार २८७ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी १९ जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर सेक्टर २० येथील ८२ वर्षीय ज्येष्ठ नागरिक सेवानिवृत्त आहेत. २०२३ मध्ये त्यांना एका व्यक्तीने मेसेज पाठविला आणि पाच रुपयांच्या दोन लाख ९८ हजार मिळतील, असे सांगितले. त्यानुसार १४ अनोळखी इसमांनी त्यांना व्हॉट्सॲप कॉल करून एकूण आठ लाख ७० हजार २८७ रुपये भरण्यास भाग पाडले. नोव्हेंबर, २०२४ मध्ये त्यांना दुबई येथे ३० लाखांची लॉटरी लागली असून, ते पैसे मिळण्याकरता फी भरावी लागेल, असे सांगितले. त्यानुसार पाच अनोळखी इसमानी त्यांना लॉटरीची रक्कम मिळण्याकरता वेगवेगळी कारणे सांगून पैशांची मागणी केली. त्यानुसार ८२ वर्षीय ज्येष्ठाने ३७ लाख रुपये त्यांच्या खात्यात जमा केले.

तक्रारकर्त्याची एकूण ४५ लाख ७० हजार २८७ रुपयांची फसवणूक करून लॉटरीची रक्कम दिली नाही. आपली फसवणूक झाल्याची लक्षात येताच त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मृत महिलेच्या नावावरील जमिनीची परस्पर विक्री

**पनवेल : वार्ताहर**

दहा वर्षांपूर्वी मृत महिलेच्या नावावरील जमीन स्वतःच्या नावावर करून ती जमीन इतर व्यक्तीला विक्री केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या जमिनीचे बाजारमूल्य एक कोटी २४ लाख रुपये आहे. या गुन्हयाची प्राथमिक चौकशी पनवेल पोलिसांनी केल्यावर या प्रकरणात फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

तक्रारदार यांच्या आईच्या नावावर वाघाची वाडी येथे ११ गुंठे जमिनीचा भूखंड होता. कोणीही फिरकत नसल्याचा फायदा घेत दोन भामट्यांनी जमीन परस्पर विकली. याप्रकरणी दोनही भामट्यांचा शोध सुरू आहे. २०१५ मध्ये संबंधित जमिनीचे खोटे मालक उभे करून त्यांची दस्त नोंदणी करून ती जमीन भामट्यांच्या नावे केली.

विशेष म्हणजे पीडित व्यक्तीच्या आईचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या जागी खोटी कागदपत्रे दाखऊन हे दस्त बनविल्याचे उघड झाले. तक्रारदार व्यक्ती अनेक वर्षांनी वाघाची वाडी येथे आल्यावर त्यांना येथे बांधकाम झाल्याचे दिसले. यावेळी जमीन खरेदी केलेल्या व्यक्तीला स्वतःची ओळख देत चौकशी केली. तसेच मुद्रांक नोंदणी शुल्क विभागातूनही हा गैरव्यवहार समोर आला.

# पनवेल एज्युकेशन सोसायटीची शैक्षणिक वाटचाल कौतुकास्पद

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे गौरवोद्गार



**पनवेल : वार्ताहर**

शैक्षणिकदृष्ट्या विद्यार्थ्यांचे स्तर उंचाविण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून सातत्याने होत आहे. त्यामुळेच अनेक विद्यार्थी दहावी, बारावीचे शिक्षण घेत असताना ९७ टक्क्यांपर्यंत पोहचून देदिप्यमान यश मिळवितात हे सर्व कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कारावेळी केले.

या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इक्बाल काझी, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, माजी नगरसेवक मुकीत काझी, नुर पटेल, पो.नि.अभिजित अभंग, मुख्याध्यापक जनाब आरिफ फरदिन पटेल, मोहम्मद नुर पटेल, अमिउद्दीन पटेल, फाजीत पटेल, नासिर अब्दुल हाफिज पटेल, निसार पटेल, आचिप जुबेर मुल्ला, जुबेर अब्दुल, रज्ञाक पटेल, अकिल अधिकारी, बाबा मास्टर, मा.नगरसेविका नाज हाफिज, जैनाब शेख, माजी नगरसेविका शर्फिना हनिफ मुल्ला, फरहत मॅडम, खालिद पिट्टू आदींसह अनेक मान्यवर विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, शिक्षणाच्या माध्यमातून अनेक युवा पिढी वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेत आहे. देशात व जगात अत्याधुनिक शिक्षण प्रणाली आता रुजू होवू लागली आहे त्याचा फायदा आजच्या विद्यार्थ्यांनी घेणे गरजेचे आहे. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इक्बाल काझी हे गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांसाठी स्वखर्चाने शैक्षणिक दृष्ट्या ते सक्षम होण्यासाठी धडपडत आहेत. शिक्षणाप्रती त्यांचे असलेले प्रेम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

म्हाडाचे मा.सभापती बाळासाहेब पाटील यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, आमच्या काळातील शिक्षण व आताची शिक्षण प्रणाली यामध्ये जमिन आसमानाचा फरक आहे. त्या काळात ६० ते ७०% मिळविणारा विद्यार्थी प्रथम येत होता. तर आज ९७% गुण मिळवून विद्यार्थीनी प्रथम आली आहे. हा आपल्यासाठी गौरवच आहे. पनवेल एज्युकेशन सोसायटीला आम्ही वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे.

या वेळी दहावी, बारावी यशस्वी विद्यार्थी त्याचप्रमाणे स्कॉलरशिप उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

# सीकेटी विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल येथील मराठी माध्यमाचा आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून २०२५ मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.



या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गोविंदा सत्रे, पर्यवेक्षक कैलास कमलाकर म्हात्रे, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या हॉलमध्ये एकत्र जमून योगाचे महत्त्व सांगणारे प्रार्थना व भाषण ऐकले. विद्यार्थ्यांना योगाचे फायदे मानसिक आणि शारीरिक आरोग्य यांचे महत्त्व सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी योग प्रशिक्षणाच्या माननीय अलका आव्हाड मॅडम व त्यांच्या सहकारी तमन्ना शर्मा मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने केली. त्यात सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, त्रिकोणासन, प्राणायाम व ध्यान यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य जागरूकता निर्माण करणे आणि नियमित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून देणे हा होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन विलास यशवंतराव यांनी केले. तसेच त्यांनी उपस्थित मान्यवरांच्या प्रती आभार व्यक्त केले.

# ऑलिंपियाड परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कै. बाळाराम धर्मा पाटील शिक्षण संस्था संचालित सुषमा पाटील विद्यालय आणि ज्यु. कॉलेज कामोठे या शाळेतील विद्यार्थी अनय अतिश साळुंखे इयत्ता–तिसरी मराठी माध्यम यांने ऑलिंपियाड (परीक्षा) गणित या विषयात राज्यात सातवा क्रमांक तसेच महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत गुणवत्ता यादीत ८३वा क्रमांक मिळवला.

यासोबतच माध्यमिक विभागातील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता आठवीची विद्यार्थिनी विद्या खरे व अश्मी क्षीरसागर यांनी ऑलिंपियाड परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे शाळेचे संस्थापक दिलीप पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ. मंदार पनवेलकर, संचालक अर्जुन गोवारी, गोरखनाथ पोळ तसेच मुख्याध्यापक बबन काटकर, प्रकाश म्हात्रे, मनीषा जाधव, मोहिनी वाघ यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# पहिल्या पतीच्या मेसेजमुळे नवऱ्याची पत्नीला मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीला तिच्या पहिल्या पतीचा व्हॉट्सॲपवर मेसेज आल्याच्या रागातून तिच्या दुसऱ्या पतीने तिला मारहाण करत डोके भिंतीवर आपटल्याप्रकरणी ३० वर्षीय दुसऱ्या पतीविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२७ वर्षीय महिला तळोजा येथे राहत असून, तिचा घटस्फोट झाला आहे. त्यानंतर तिने २०२३ मध्ये दुसरे लग्न करून तळोजा येथे राहण्यास आली. मे महिन्यात तिच्या पहिल्या पतीचा तिला मेसेज आला. याबाबत दुसऱ्या पतीने विचारणा केली असता, नॉर्मल मेसेज असल्याचे तिने सांगितले. या वेळी संतापलेल्या तिच्या दुसऱ्या पतीने तीला शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर तो तिला नेहमी त्रास देत मारहाण करू लागला.

दरम्यान, जून महिन्यात तिचा दुसरा पती कामावरून घरी आला व त्याने तिला घराबाहेर काढले. घरात घेण्यासाठी ती विनवण्या करू लागताच त्याने तिला घरात खेचून लाटण्याने मारहाण केली. तसेच केस धरून भिंतीवर डोके आपटले. या प्रकरणी तिने दिलेल्या तक्रारीवरून, पोलिसांनी तिच्या दुसऱ्या पतीविरोधात गुन्हा नोंद केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# सीकेटी कॉलेजमध्ये महिलांचे आरोग्य, व्यक्तिमत्व विकासावर कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि ब्रँडटच अँड अनॅलिटक्स यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार (दि.२०) महिलांचे आरोग्य आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सानिया पठाण, समन्वयक, ब्रँडटच अँड अनॅलिटक्स, मुंबई ह्या प्रमुख वक्त्या लाभल्या.

या वेळी महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी महिला विकास कक्षा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देवून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. नंतर प्रमुख वक्त्या सानिया पठाण यांनी विद्यार्थिनींना महिलांचे आरोग्य, स्वच्छता आणि व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील १०३ विद्यार्थिनींनी उस्फुर्त सहभाग घेतला. त्यानंतर सिद्धांत कांबळे कार्यकारी अधिकारी, ब्रँडटच अँड अनॅलिटक्स, मुंबई यांच्यामार्फत कार्यशाळेत सहभागी विद्यार्थिनींनी भेटवस्तू देण्यात आल्या.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा.क्रांती जोशी, प्रा.निलिमा घरत व प्रा. भावेश भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. सोनाली हुद्दार यांनी केले. कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.





**पनवेल :** जागतिक योग दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा बामणडोंगरी येथे विद्यार्थ्यांसोबत वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांनीही योगासने केली.




**पनवेल :** श्रीमद राजचंद्र आक्षम वलसाड गुजरात नवी मुंबई यांच्यातर्फे वाकडी, कातवाडी, मोरबे, महाळुंगी, कातरवाडी, खैरवाडी, गारमाळ, नेरेपाडा, कातरवाडी, फणसवाडी येथे ताडपत्री वाटप करण्यात आली. या वेळी अध्यक्ष केयर मोदी, भावेश शहा, नामदेव जमदाडे, रवींद्र पाटील, दिनेश फडके, हरिश्चंद्र गोंधळी आदी उपस्थित होते.

# 'आयपीआर आणि केमोइन्फॉरमॅटिक्स'वर कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा, रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे, उरण, यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ जून ते २३ जून २०२५ या कालावधित आयपीआर आणि केमोइन्फॉरमॅटिक्स यावर चार दिवसिय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



या ई–कार्यशाळेचे उद्दिष्ट शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना आयपीआर आणि केमोइन्फॉरमॅटिक्स विषयी सविस्तर ज्ञान मिलावे. संशोधन कार्य करताना ते या विषयातिल विविध पैलूंचा वापर करू शकतात.

या कार्यशाळेचे आयोजन प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख, प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशालेची प्रस्तावना प्रा. तमसील शहाजहान व डॉ. गुरुमीत वाधवा यानी केली तसेच उद्घाटन समयी डॉ. आमोद ठक्कर, डॉ अनिल पालवे व डॉ. साजिद शेख यानी आपले मनोगत व्यक्त करूण कार्यशालेसाठी शुभेच्छा दिली.

या कार्यशाळेमध्ये १०० हून अधिक विद्यार्थि वा प्रध्यापकानी सहभाग घेतला. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# कळंबोली भाजपतर्फे संकल्प सभा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील भाजपप्रणित सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सरकारच्या जनहितार्थ कामांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी कळंबोलीमध्ये भाजप मंडळच्या वतीने संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते.




या सभेस आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, संपर्क प्रमुख रमेश मुंडे, कार्यक्रमाचे वक्ते जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, बबन मुकादम, रवी भगत, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, चिटणीस संदीप म्हात्रे, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष संदीप भगत, सुनील ढेम्बरे, विनोद बोरसे, महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा निकम, बैजा बारगजे, सरस्वती कथारा, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, युवा नेते अमर ठाकूर, ज्येष्ठ नेते गुरुनाथ ठाकूर, सितेंद्र शर्मा, प्रभाग अध्यक्ष रामा महानवर, प्रकाश शेलार यांच्यासह ज्येष्ठ, युवा व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

# रायगडात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## एकाग्रता जपण्यासाठी प्रत्येकाने योग करावा -जिल्हाधिकारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात एकाग्रता जपण्यासाठी योग करणे अत्यंत महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शनिवारी (दि. २१) अलिबाग येथे केले. जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नेहूली येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या प्रशस्त बॅडमिंटन हॉलमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते.



या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, मेरा युवा भारतचे अमित फुंडे, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, क्रीडा अधिकारी सुचिता ठमाळे, आकाश डोंगरे, श्री अंबिका योग कुटीरचे संस्थापक वीरेंद्र पवार या संस्थेचे प्रशिक्षक तसेच स्वयंसिध्दा सामाजिक विकास संस्थेचे स्वयंसेवक, प्रशिक्षणार्थी, सरकारी अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, आपल्या देशाचे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत भाषण करताना संपूर्ण जगाला योगाचे महत्त्व पटवून दिले. संयुक्त राष्ट्र महासभेने अधिकृतपणे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. अप्राप्त वस्तू प्राप्त होणे याला योग म्हणतात. प्राणायाम ध्यान आसने यातून मानसिक एकाग्रता वाढते. यातून आपल्याला जे साध्य करायचे आहे ते साध्य होते. नेमून दिलेले कर्म विहित वेळेत, सातत्याने केले तर आपण चांगल्या विश्वाची निर्मिती करू शकतो. एकाग्रता मिळवण्यासाठी योग केले पाहिजे आणि योगात सातत्य आवश्यक आहे आणि आयुष्यात शिस्तीची गरज आहे. शिस्त योगाद्वारे लागते,आरोग्य सुधारते. आज प्रत्येकाला ताण-तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये नियमितपणे योग, व्यायामांचा समावेश करावा. योग हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारीरिक, मानसिक आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगामुळे मन:शांती तर मिळतेच, शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रतासुद्धा वाढण्यास मदत होते, असेही जिल्हाधिकारी जावळे म्हणाले.

योग शिक्षिका माधवी पवार यांनी प्रार्थनेने योग प्रात्यक्षिकांची सुरुवात झाली. या वेळी योग पूर्व व्यायाम प्रात्यक्षिकासह प्राणायाम, नाडी शोधन क्रिया, भ्रामरी हे योग प्रकार करून घेण्यात आले. त्यानंतर ध्यानसाधना करण्यात आली. उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन योगासने केली.

## योगाभ्यास सर्वदूर पोहचविणे आवश्यक -मंत्री आदिती तटकरे

**माणगाव : प्रतिनिधी**

भारताने जगाला दिलेले योगसाधनेचे अमूल्य ज्ञान प्रत्येकाच्या जीवनात रूजावे, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, असे प्रतिपादन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी केले.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयुष मंत्रालय, भारत सरकार तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत माणगाव तालुका प्रशासन, तालुका क्रीडा अधिकारी व मनोयोग मंदिर, माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग साधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सहभाग घेत योगसाधना केली. यावेळी उपविभागीय अधिकारी संदीपान सानप उपस्थित होते.

या वेळी बोलताना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, आपल्या शरीराला व मनाला अंतर्बाह्य निर्मळ करण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे योग. नियमित योगसाधना केल्याने जीवनशैलीत सकारात्मक बदल होतो, मनास सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते आणि आयुष्याकडे बघण्याचा दृषष्टकोनही सकारात्मक बनतो. उपस्थितांनी एकत्रितपणे विविध योगासनांची प्रात्यक्षिके केली व योगाभ्यासाचा अनुभव घेतला.

या वेळी माणगाव तालुक्यातील अधिकारी, पोलीस अधिकारी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, पत्रकार व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये योग दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे. बी. सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.





राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. जगदीश शिगवण यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय योग दिनाची पार्शवभूमी प्रा. हर्षल जोशी यांनी सांगितले तसेच मानवी जीवनात योग व्यायाम व आसने, सूर्यनमस्कार यांचे किती महत्व आहे हे विविध उदारहरणांवरून स्पष्ट करीत अनुभव सांगितले. प्रा. जोशी यांनी व्यायामाचे प्रकार विद्यार्थ्यांकडून करून घेतले. डॉ. शिगवण यांनी शारीरिक हालचालीचे व्यायाम घेतले व मुख्य प्रात्यक्षिकांसह करून दाखविले. ग्रंथपाल अमित बाकाडे यांनी व्यायाम व आहाराचे महत्व सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अमृता देशमुख यांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास प्रा. अशोक मोरे, प्रा. भारत पवार, प्रा. मांडवकर, प्रा. नितीन मुटकुळे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात योग दिन साजरा

**नागोठणे : बातमीदार**

जगभरात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येत असतो. या वर्षी अकरावा योग दिन साजरा झाला.

भारतीय प्राचीन संस्कृतीत परंपरा आणि योगसाधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अगदी प्राचीन काळापासून योगाचे महत्त्व, गरज व त्याचे फायदे पटवून देण्यात आले आहेत. शारीरिक, मानसिक आध्यात्मिक व भावनिक यांचे संतुलन नीट राहण्यासाठी योगासने करणे आवश्यक आहे. या योगा दिनाची सुरुवात प्रथम आपल्या भारतात झाली, जो आजच्या घडीला संपूर्ण जग साजरा करत आहे. याच अनुषंगाने शनिवारी (दि. २१) नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या वेळी मीरा राकेश टेमघरे यांनी उपस्थितांना योगाचे धडे दिले. सकाळी ठीक साडेसात वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाला नायब तहसीलदार अंधारे, मंडळ अधिकारी रमेश म्हात्रे, नागोठणे सजाचे तलाठी प्रवीण साळुंके, ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे, सरपंच सुप्रिया संजय महाडिक, सदस्य अमृता महाडिक, भाविका गिजे, भरत गीजे, अ‍ॅड.श्रीकांत रावकर, शैलेश रावकर, निलोफर पानसरे, नम्रता माने यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मीरा टेमघरे यांनी उपस्थितांकडून विविध प्रकारची योगासने व प्राणायाम करून घेतले. त्यामुळे सर्व उपस्थितांमध्ये वेगळ्याच प्रकारचा उत्साह पहायला मिळाला.

## सुधागडातील घोटवडे येथे अंबा नदी पुलावर पाण्यात अडकलेली कार तरुणांनी काढली बाहेर





**परळी ते घोटवडे गाव व सभोवतालच्या आदिवासी वाड्या पाड्यांना जोडणारा घोटवडे नदी पूल जुना व जर्जर झाला आहे. पुलाचा मधला भाग पूर्णपणे झुकला आहे. या पुलावर वारंवार अपघाती घटना घडत आहेत. वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेला पूल नवीन बांधण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थ व सामाजिक संघटनांनी वारंवार केली आहे. लवकरात लवकर मंजूर झालेल्या नवीन पुलाचे काम करावे.**

**संदेश भालेराव, घोटवडे ग्रामस्थ**

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात सलग दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळत होता. अशातच पालीसह तालुक्यातील अनेक गावांना जोडणारे रस्ते, सखोल भागातील घरे व नदी पुलांना पुराच्या पाण्याने वेढा दिला. परळी घोटवडे येथे अंबा नदी पुलावर पुराच्या पाण्यात चक्क कार अडकली. कारमध्ये असलेली पोलीस महिला व दोन विद्यार्थी पुराच्या पाण्यात अडकून पडल्याने त्यांनी मदतीसाठी धावा केला. या वेळी जवळपासच्या तरुणांनी प्रसंगावधान राखत तत्काळ मदत कार्य सुरू केले.

भैरवनाथ मित्र मंडळ परळी येथील तरुणांनी दोर बांधून अविरत व शर्थीचे प्रयत्न करून कार पुरातून सुखरूप बाहेर काढली. बराच वेळ पुरात काळजाचा ठोका चुकविणारा थरार सुरू होता.

तरुणांच्या व स्थानिकांच्या मदतकार्याने मोठा अनर्थ टळला. संबंधित महिला आपल्यासोबत नातेवाईक असलेल्या विद्यार्थ्यांना घेऊन कारने जात होती. पुलाचा मधला भाग पूर्णपणे झुकला असल्याने कार पुलाच्या मधोमध आल्यावर अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. चहूबाजुंनी कारला पुराच्या पाण्याने वेढा दिला. त्यामुळे भयभीत झालेल्या महिलेने मदतीसाठी याचना केली. या वेळी स्वतःचा जीव धोक्यात घालून तरुणांनी पुरात अडकलेल्या तिघांचे प्राण वाचवले. तरुणांची वेळीच मदत मिळाली नसती, तर मोठी दुर्घटना घडली असती. त्यामुळे देवदूत बनून आलेल्या या जांबाज तरुणांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## तळा कॉलेजमध्ये वाचन दिन



**तळा : प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील श्री. मनोहर केशव रणदिवे ग्रंथालयामार्फत वाचन दिन साजरा करण्यात आला.

प्रथमतः डॉ. विनय देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग्रंथालयांमध्ये भरवण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये विविध विषयाची पुस्तके ठेवण्यात आली होती. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी ग्रंथालयातील विविध पुस्तके हाताळली. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. विनय देशमुख हे केंद्रीय समृद्धी मत्स्यकीय संस्था मुंबई येथे १९७७ ते २०१४पर्यंत वैज्ञानिक म्हणून कार्यरत होते. त्यांनी समुद्रातील मासे, कोळंबी, करंदी, आदीवर संशोधन कार्य सुरू होते. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली, अशी माहिती दिली.

महाराष्ट्र शासनाच्या अनेक समित्यांवर डॉ. देशमुख यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक जनरलमध्ये ८०पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित केलेले आहेत. निवृत्त झाल्यावर ओएनजीसी व बीएनएचएस यासारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये सल्लागार म्हणून काम पाहिले आहे तसेच द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये सीडीसी कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीवर सदस्य म्हणून कार्यरत होते, असेही डॉ. यादव म्हणाले.

## पेण-खोपोली मार्गावरील वाहतूक कोंडीचा विद्यार्थी, कामगारांना बसतोय फटका!

### रस्त्यालगत अवजड वाहने पार्किंग करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली-पेण मार्गावरील कारखाने परिसरात रस्त्यालगतच अवजड वाहने पार्किंग केल्या जातात. त्यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. याचा फटका एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विशेषत: शाळकरी विद्यार्थी, पालक व कामगारांना बसत आहे.



विद्यार्थी शाळेत उशिरा पोहचल्याने गुरुजनांच्या रोषाला सामोरे जावे लागते, तर कामगारांना लेट मार्क लागल्यावर पगारातून रक्कम कापून घेतली जाते. त्यामुळे आर्थिक भुर्दंडांचा तोटा कुटुंबांवर पडत आहे. कारखान्यांची मुजोरी थांबवावी, अशी मागणी विद्यार्थी पालक व कामगार करीत आहेत.

पेण-खोपोली मार्गावर विविध कारखान्यांच्या मालाची चढ उतार करण्यासाठी ट्रक, ट्रेलर कारखान्यांच्या समोर मार्गावरच दुतर्फा उभे असतात. एक ते दीड किमी अंतरावर ही वाहने दुतर्फा पार्क केली जात असल्याने हे अंतर पार करण्यासाठी एक ते दीड तासाचा अवधी लागत आहे. या वाहनांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून वाहतूक कोंडीने रोजगारावरही गदा आली आहे.

पेण-खोपोली रस्त्याचे क्राँक्रीटीकरण केल्यामुळे हा रस्ता सुसाट बनला आहे. येथे वाहनांची लांबलकच रांग असल्यामुळे समोरून येणारी भरधाव वाहने दिसतन सल्यामुळे अपघातांत वाढ झाली आहे. कंपनी व्यवस्थापनाने कंपनीच्या आवारातच वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करावी, तर आरटीओ अधिकाऱ्यांनी बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

## कोंबड्या खाऊन पोल्ट्रीमध्ये सुस्तावलेल्या १० फुटी अजगराला नैसर्गिक अधिवासात सोडले

**माणगाव : बातमीदार**

वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर यांच्यासोबत सहकारी मित्र आनंद पत्की आणि म्हसळा वनपरिक्षेत्र अधिकारी संजय पांढरकामे, देहेन वनपाल महादेव कराडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक सुदर्शन राठोड यांनी अजगराचा बचाव करून त्याला सुरक्षितरित्या जंगल परिसरात सोडले.



म्हसळा तालुक्यातील वांगणी गावात लायनेल परेरा यांच्या फार्म हाऊसमधील पोल्ट्री शेडमध्ये साधारण १० फुटी अजगर कोंबड्या खाऊन सुस्तावल्याचे येथे बागेत काम करणाऱ्या कामगारांना दिसून आले. अजगराने दोन कोंबड्या खाल्ल्या होत्या व एक कोंबडी झटापटीत मरण पावली होती. चारही बाजूने बंद पोल्ट्रीमध्ये जवळच्या झाडावरून छप्पराखाली असलेल्या पोकळीतून अजगर आत आल्याचे निदर्शनास आले.

अजगर आकाराने मोठा असल्यामुळे येथील स्थानिक कामगार घाबरले. अजगर सकाळपासून पोल्ट्रीशेडमध्ये शांतपणे बसून होता. ही घटना लायनेल परेरा यांनी माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर यांना सांगितली. यानंतर त्वरित वनविभागालादेखील संपर्क साधत संध्याकाळी सुरक्षितरित्या अजगराचे इन सिटू बचावकार्य करण्यात आले.

जंगल किंवा नैसर्गिक अधिवास असलेल्या परिसराजवळील गावांमधून अथवा शहरांच्या वेशीवरून वन्यप्राणी अथवा साप पकडून इतरत्र कोठेही स्थलांतरित करण्याची शक्यतो गरज नसते. घटनास्थळीच त्याच परिस्थितीमध्ये सापांना स्थलांतरित न करता जागच्या जागी कशा प्रकारे बचावकार्य करू शकता येते याचे उत्तम उदाहरण या बचावकार्याच्या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

अजगर हा वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत अनुसूची १मध्ये येत असून त्याला कायद्याने वाघांइतकेच सर्वोच्च दर्जाचे संरक्षण प्राप्त आहे. सध्याच्या पावसाळी दिवसांमध्ये अनेक ठिकाणी अजगर भक्ष्याच्या शोधात किंवा मग आडोशासाठी भरकटून मानवी वसाहतींजवळ आढळून आल्यास वनविभागाला संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नीरज चोप्राने पॅरिस डायमंड लीग जिंकली

## जर्मनीच्या ज्युलियन वेबरला टाकले मागे



**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताचा 'गोल्डन बॉय' आणि दोन वेळचा ऑलिम्पिक चॅम्पियन भालाफेकपटू नीरज चोप्रा याने पॅरिस डायमंड लीग स्पर्धा जिंकली आहे. फ्रान्समधील स्टेड सेबास्तियन चार्लेटी येथे झालेल्या पुरुष गटातील भालाफेक स्पर्धेतील फायनलमध्ये नीरजने पहिल्या प्रयत्नात ८८.१६ मीटर सर्वोत्तम फेकीसह या मोहिमेची सुरुवात केली. हा प्रयत्न त्याला अव्वलस्थानावर कायम ठेवण्यास पुरेसा ठरला.

पॅरिसमधील प्रतिष्ठित स्पर्धेत नीरज चोप्रासमोर मागील दोन स्पर्धेत तगडी टक्कर देणाऱ्या जर्मनीच्या ज्युलियन वेबर याचे आव्हान होते. या वेळी नीरज त्याच्यावर भारी पडला. जर्मनीच्या वेबरला पहिल्या प्रयत्नातील ८७.८८ मीटर लांब अंतरावरील फेकीसह दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

पहिल्या प्रयत्नात ८८.१६ मीटर फेकीसह जबरदस्त सुरुवात करणाऱ्या नीरज चोप्राने दुसऱ्या प्रयत्नात ८५.१० मीटर अंतर भाला फेकला. तिसरा, चौथा आणि पाचवा प्रयत्न फाउल ठरल्यावर सहाव्या प्रयत्नात नीरज चोप्राने ८२.८९ मीटर लांब भाला फेकल्याचे पहायला मिळाले. तीन प्रयत्न फसले. एवढेच नाही तर या वेळी ९० पारचा डावही साधता आला नाही, पण पहिल्या प्रयत्नातील फेक सर्वांत सरस ठरली अन् अव्वल क्रमांकावर राहत त्याने स्पर्धा गाजवली.

जवळपास आठ वर्षांनी नीरज चोप्रा पॅरिस डायमंड लीग स्पर्धेत सहभागी झाला होता. २०१७मध्ये नीरज चोप्राला ८४.६७ मीटर थ्रोसह पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. मे २०२५मध्ये दोहा डायमंड लीग स्पर्धेत ९० मीटर पारचे ध्येय साध्य केल्यावर नीरज यंदाच्या स्पर्धेत आत्मविश्वासाने मैदानात उतरला अन् त्याने ही स्पर्धाही जिंकूनही दाखवली.

नीरज आता २४ जून रोजी ओस्ट्राव्हा गोल्डन स्पाइक २०२५ ॲथलेटिक्स मीटमध्ये मैदानात उतरेल. चेक प्रजास्ताकमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर ५ जुलै रोजी बंगळुरूत आयोजित एका स्पर्धेत नीरज खेळताना दिसेल.



## महाडच्या कराटेपटूंचे राष्ट्रीय स्पर्धेत यश

**महाड : प्रतिनिधी**

चौथ्या राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिपमध्ये महाड येथील चॅम्पियन्स कराटे क्लबच्या खेळाडूंनी आपला उत्कृष्ट खेळ दाखवून महाराष्ट्राचे नाव देशभरात गाजवले.

महाडमधील चॅम्पियन्स कराटे क्लबच्या श्रावणी तुकाराम कोंडविलकर हिने देहरादून (उत्तराखंड) येथे कॅडेट गर्लमध्ये ४२ किग्रॅ गटात कुमिते (फाईट) प्रकारात सुवर्णदक पटकाविले, तर यश नवनीत साळवी यानेही देहरादून येथे सब ज्युनिअर ४५ किग्रॅ गटात कुमिते (फाईट) या प्रकरणात सुवर्णपदक प्राप्त केले. याशिवाय तेजस्वी नरेंद्र वाळंज हिने हैदराबाद येथे सीनियर गर्ल ५० किग्रॅ गटामध्ये कुमिते (फाईट) या प्रकारात कांस्यपदक जिंकले.

या खेळाडूंचे अभिनंदन होत आहे. यापैकी श्रावणी कोंडविलकर ही साऊथ एशियन कराटे चॅम्पियनशिप (श्रीलंका) आणि दुसऱ्या एशियन युथ लीग (चीन) येथे खेळण्यास पात्र ठरली आहे.


पदक विजेते खेळाडू चॅम्पियन्स कराटे क्लब महाड येथे गेली नऊ वर्ष प्रशिक्षक प्रसाद सावंत यांच्याकडे प्रशिक्षण घेत असून क्लबचे संस्थापक शिहान संतोष मोहिते यांचे वेळोवेळी मार्गदर्शन त्यांना मिळाले आहे.

कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष शिहान सलाउद्दीन अन्सारी आणि जनरल सेक्रेटरी शिहान संदीप गाडे यांनी यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले आणि पुढील स्पर्धाकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

**महाराष्ट्र प्रीमियर लीग**

## 'रायगड रॉयल्स' क्वालिफायर २मध्ये दाखल

### कोल्हापूर संघाने संधी दवडली; व्हिडीओ व्हायरल



**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील एमसीए स्टेडियममध्ये महाराष्ट्र प्रीमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेत रायगड रॉयल्स संघाने कोल्हापूर टस्कर्सला पराभूत करून क्वालिफायर २मध्ये प्रवेश केला आहे. या सामन्यात हास्याचे फवारे उडविणारा एक प्रसंग घडला, ज्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

१६० धावांचा पाठलाग करताना रायगड रॉयल्सच्या विकी ओस्तवालने कव्हर क्षेत्रात फटका मारून दोन धावा घेण्याचा प्रयत्न केला, पण धावताना दोन्ही फलंदाज चुकून एकमेकांना धडकले आणि खेळपट्टीवर कोसळले. हा क्षण कोल्हापूर टस्कर्ससाठी सुवर्णसंधी होती, कारण त्यांना थेट रनआऊटची संधी मिळाली होती. मैदानावरचा थ्रोही थेट यष्टीरक्षकाकडे आला, मात्र त्याने स्टम्पला चेंडू लावून रनआऊट न करता चेंडू गोलंदाजाकडे फेकला. त्यामुळे गोलंदाज अटमन पोरे पूर्ण गोंधळून गेला आणि चेंडू हाताळण्यात त्याने चूक केली.

तेवढ्यात दुसरा एक क्षेत्ररक्षक चेंडू घेऊन यष्टीकडे धावला, मात्र त्याचाही थ्रो चुकला आणि कोणताही खेळाडू बॅकअपला नव्हता. ओस्तवालने हा गोंधळ ओळखून पुन्हा क्रीज गाठली आणि रनआऊटपासून तो बचावला. या संधीमुळे जीवदान मिळालेल्या ओस्तवालने नंतर सामना पूर्णपणे फिरवून टाकला. त्याने ५४ चेंडूंमध्ये ७४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करून रायगड रॉयल्सला विजय मिळवून दिला.

या विजयामुळे रायगड रॉयल्सने क्वालिफायर २मध्ये प्रवेश केला असून आता त्यांचा पुढचा टी-२० सामना पुणेरी बाप्पा संघाशी होणार आहे.

## नेतृत्व करताना पहिल्याच कसोटीत शुबमन गिलचे शतक

**लीड्स : वृत्तसंस्था**

इंग्लंड विरुद्धच्या लीड्सच्या कसोटी सामन्यात यशस्वी जैस्वालपाठोपाठ टीम इंडियाचा नवा कर्णधार शुबमन गिल याच्या भात्यातूनही शतकी खेळी पहायला मिळाली. शुबमनने १४ चौकारांच्या मदतीने १४० चेंडूत कसोटी कारकिर्दीतील सहाव्या शतकाला गवसणी घातली. विशेष म्हणजे कसोटी संघाचे नेतृत्व करताना पहिल्याच कसोटी सामन्यात त्याने इंग्लंडच्या मैदानात आपले पहिले शतक झळकावले आहे.

शुबमन गिल हा भारतीय कसोटी संघाचे नेतृत्व करताना पहिल्याच सामन्यात शतक झळकवणारा चौथा भारतीय कर्णधार ठरला आहे. याआधी विजय हजारे, सुनील गावसकर आणि विराट कोहली यांनी अशी कामगिरी करून दाखवली होती, तर एकंदरीत विचार करता कसोटी क्रिकेटमध्ये कॅप्टन्सी करताना पहिल्या डावात शतक झळकवणारा तो २३वा खेळाडू आहे.



शुबमन गिल याने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात खास छाप सोडलीये, पण इंग्लंडमधील त्याची कामगिरी ढिसाळ राहिली होती. आतापर्यंत इथे खेळलेल्या तीन सामन्यात त्याने फक्त ८८ धावा केल्या होत्या. कॅप्टन्सीची जबाबदारी असताना त्याने पहिल्याच कसोटी सामन्यातील पहिल्याच डावात दमदार शतक झळकावले. चार वर्षांनी कसोटीत त्याच्या भात्यातून आशिया बाहेरील मैदानात शतक पहायला मिळाले. याआधी २०२१मध्ये शुबमनच्या भात्यातून १५ जानेवारी २०२१मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १४६ चेंडूत ९१ धावांची खेळी पहायला मिळाली होती.

आतापर्यंत शुबमन गिलने तीन कसोटी सामन्यात १४.६६च्या सरासरीसह इंग्लंडमध्ये ८८ धावा केल्या होत्या. २८ ही त्याची इंग्लंडमधील सर्वोच्च धावसंख्या होती. या दौऱ्यावर कसोटी संघाचे नेतृत्व मिळाल्यावर त्याच्या या आकडेवारीवरून प्रश्नचिन्हदेखील उपस्थितीत करण्यात आले होते. यावर शुबमनने मागील आकडे न पाहता सर्वोत्तम कामगिरी करण्यावर लक्ष केंद्रित करतोय, असे म्हटले होते. आपल्या भात्यातील फटकेबाजीने त्याने ते सिद्धही करून दाखवले. कॅप्टन्सी करताना चौथ्या क्रमांकावर नवी जबाबदारी स्वीकारत त्याने शतकी खेळी साकारली आहे.









पनवेल : आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी आयोजित योग विथ आमदार प्रशांत ठाकूर या विशेष उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, प्रांताधिकारी पवन चांडक, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अनेक युवक, महिला, स्थानिक नागरिक तसेच विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com